सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

# महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५

[दिनांक १ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला]

**Maharashtra Act, No. III of 1976**

# The Maharashtra Debt Relief Act, 1975

***(As modified upto the 1st November 2006)***

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय औरंगाबाद यांनी भारतात, मुद्रित केले आणि
संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी प्रसिध्द केले.

२००६

[किंमत रु. ९-००]

## महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५

## अनुक्रमणिका


उद्देशिका, पृष्ठे

कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. ५

२. व्याख्या. ५

### प्रकरण दोन

### ऋणांचे पुनरुज्जीवन

३. सन १९७५ चा अध्यादेश क्रमांक ७ खालील सर्व मुक्त ऋणांचे पुनरुज्जीवन. ७

### प्रकरण तीन

### विवक्षित ऋणांचे परिसमापन

४. विवक्षित ऋणांपासून मुक्तता व तिचे परिणाम. ८

५. तारण दिलेली मालमत्ता, इत्यादीच्या विल्हेवाटीस मनाई आणि शास्ती. ९

६. मालमत्तेचा कब्जा ऋणकोला देणे भाग पाडण्याचा विवक्षित अधिकाऱ्यांचा अधिकार. ९

७. धनकोस ऋणकोच्या हक्कमागणीबाबत विवाद उपस्थित करता येईल. ९

८. प्रवेश करण्याचा आणि झडती घेण्याचा अधिकार. १०

९. विवक्षित प्रकरणांमध्ये तारण दिलेला मालमत्तेचे मूल्य धनकोने देणे आवश्यक असणे. ११

१०. क्षुल्लक किंवा तापदायक अर्जासाठी दंड लादण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार. ११

११. अधिकारितेस रोध. ११

१२. ज्यामध्ये या अधिनियमाखाली निर्णय देणे आवश्यक आहे, अशा वादप्रश्नांचा अंतर्भाव असेलेले दावे. ११

१३. ऋणाच्याऐवजी श्रमाचा करारनामा निरर्थक ठरणे. १२

### प्रकरण चार

### कामगारांच्या ऋणांवरील अधिस्थगन

१४. विवक्षित प्रकरणांमध्ये कामगारांच्या ऋणांवरील अधिस्थगन. १२

१४-अ. प्रकरणे चार व पाच अंमलात असण्याचा तात्पुरता अवधी. १३

## अनुक्रमणिका-चालू


कलमे — पृष्ठे

### प्रकरण पाच

### लहान शेतकऱ्यांविरुध्दच्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीवरील अधिस्थगन

१५. विवक्षित हुकुमनाम्याच्या बाबतीत कार्यवाही स्थगित करणे. १३

१६. दिवाणी कारागृहात स्थानबद्ध असलेल्या व्यक्तींची सुटका. १३

१७. हप्ते भरण्यात कसूर केल्याबद्दल सूट. १४

१८. अंमलबजावणीसाठी मुदतीची गणना करणे. १४

१९. विवक्षित हुकुमनाम्याच्या रक्कमां देणे. १४

२०. लहान शेतकऱ्यांनी केलेले हस्तांतरण निरर्थक ठरणे. १४

२१. विवक्षित प्रकरणात हक्कमागणीच्या आणि व्याजाच्या रकमेवर निर्बंध. १५

### प्रकरण पाच-अ

### विवक्षित शेतकरी व कामगार यांच्या ऋणांचे समायोजन

२२. प्रकरण पाच-अ चा प्रारंभ. १५

२३. व्याख्या. १५

२४. ऋणांच्या समायोजनासाठी अर्ज. १७

२५. प्रत्येक धनकोने व ऋणकोने न्यायालयासमोर खरे व अचूक विवरणपत्र दाखल करणे. १७

२६. ऋणको नसलेल्या व्यक्तींच्या अभिहस्तांकितीला या प्रकरणाखांलील लाभ घेण्याचा हक्क नसणे. १८

२७. समझोता अभिलिखित करण्यासाठी अर्ज. १८

२८. ऋणांचे विवरणपत्र सादर करण्यासाठी ऋणकोवर व धनकोवर नोटीस बजावणे. १९

२९. ज्यांच्या संबंधात समायोजनासाठी किंवा समझोत्यांसाठी अर्ज करण्यात आलेला नाही अशी ऋणे नष्ट करणे. १९

३०. ऋणको आणि धनको यांची कर्तव्ये. १९

३१. प्रारंभिक वादप्रश्न. २०

३२. धनकोची आणि ऋणकोची तपासणी. २०

३३. हिशेब घेण्याची पद्धती. २०

३४. विवक्षित प्रकरणी नफ्याऐवजी भाडे/खंड आकारता येईल. २१

३५. विवक्षित हस्तांतरणे ही गहाणाच्या स्वरुपात असल्याचे जाहीर करण्याचा न्यायालयाचा अधिकार. २१

३६. कलम ३५ च्या तरतुदी विवक्षित हस्तांतरणांना व हस्तांतरितींना लागू नसणे. २१

३७. मालमत्तेचा तपशील मुल्य इत्यादी ठरविणे, हे न्यायालयाचे कर्तव्य असणे. २१

३८. लबाडीने केलेला अन्य संक्रामणे किंवा भारनिरर्थक असणे. २२

## अनुक्रमणिका-चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ३९. | ऋणकोची पैसे भरण्याची क्षमता. | २२ |
| ४०. | ऋणकोकडून देय असलेली ऋणे कमी करणे. | २२ |
| ४१. | निवाडा. | २३ |
| ४२. | कोणताही पक्षकार उपस्थित न राहिल्यास एकतर्फी कार्यवाही करणे. | २४ |
| ४३. | निवाड्याची नोंदणी करणे, इत्यादी. | २४ |
| ४४. | निवाड्याची अंमलबजावणी. | २५ |
| ४५. | सूट इत्यादी बाबतीत हप्ता देण्याचे लांबणीवर टाकणे. | २५ |
| ४६. | ऋणमुक्ततेपूर्वी ऋणकोने केलेले कोणतेही अन्य संक्रामण विधिग्राह्य नसणे. | २५ |
| ४७. | ऋणकोच्या ऋणाचे परिसमापन करताना न्यायालयास त्याच्या मालमत्तेच्या विक्रीचा आदेश देता येईल. | २५ |
| ४८. | विधि व्यवसायींना उपस्थित राहण्यापासून वगळणे. | २६ |
| ४९. | अपिले. | २६ |
| ५०. | अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या सहाय्यक न्यायाधीशाकडे किंवा दिवाणी न्यायाधीशाकडे विवक्षित अपिले निकालात काढण्यासाठी पाठविण्याचा जिल्हा न्यायाधीशाचा अधिकार. | २७ |
| ५१. | न्यायालय फी. | २७ |
| ५२. | नोटीस कशारीतीने बजावण्यात येईल ते. | २७ |
| ५३. | दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी कार्यवाहीबाबत लागू असणे. | २८ |
| ५४. | दिवाणी दावे किंवा कार्यवाही यास रोध. | २८ |
| ५५. | न्यायालयापुढे असणाऱ्या या प्रकरणा खालील कार्यवाहीचा कालावधी वगळणे. | २८ |
| ५६. | कर्जाच्या परतफेडीपूर्वी उभे पीक, इत्यादींच्या अन्य संक्रामणास मनाई. | २८ |
| ५७. | नियम करण्याचा अधिकार. | २८ |
| ५८. | आणखी सूट. | २९ |
| ५९. | इतर कोणत्याही कायद्याखाली समायोजित केलेल्या ऋणांचे या प्रकरणाखाली आणखी समायोजन न करणे. | २९ |


### प्रकरण सहा

### सूट आणि निरसन


| | | |
|---|---|---|
| ६०. | सूट. | २९ |
| ६१. | सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती. | ३० |

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१

## [महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५.]

[३ जानेवारी १९७६]

[या अधिनियमास राष्ट्रपती यांची अनुमती मिळाली.]

या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या–

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४०.

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८(१५–८–१९७९) †

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २*(२१–८–१९८३) ‡

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी सन १९७५ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग पाच, पृष्ठ ८१६ (इंग्रजी) पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

* सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० हा, सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ द्वारे निरसित करण्यात आला.

‡ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याचे कलम ३ पुढील प्रमाणे वाचावे :-

सुधारणेच्या पूर्वलक्षी प्रभावाचे परिणाम.

"३ (१) याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे. की. जी. २१ ऑगस्ट १९८३ नंतर समाप्त होणार होती व जी या अधिनियमाप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने, २१ ऑगस्ट १९८५ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत वाढवण्यात आलेली आहे आणि **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी दोन वर्षा पेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता आणखी वाढवण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आले आहेत, अशा मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांची मुदत ही कोणत्याही वेळी समाप्त झाल्याचे मानण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेले त्या प्रकरणाचे सर्व उपबंध विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(२) याद्वारे आणखी असे घोषित करण्यात येत आहे की, २२ ऑगस्ट १९८३ ते हा अधिनियम, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यन्तच्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीत कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांच्या उपबंधाशी विसंगत अशी केलेली कोणतीही कारवाई किंवा वसुली यासह केलेली कोणतीही गोष्ट ही रद्दबातल असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत उक्त उपबंधांशी सुसंगत अशी केलेली कोणतीही गोष्ट ही, विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल."

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ (२१–८—१९८७) * †

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभीची तारीख दर्शविते

† सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, याचे कलम ३ खालीलप्रमाणे वाचावे :–

सुधारणेच्या पूर्वलक्षी प्रभावाचे परिणाम.

"३ (१) याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे. की. जी. २१ ऑगस्ट १९८७ नंतर समाप्त होणार होती व जी या अधिनियमाद्वारे भूतलक्षी प्रभावाने, त्या तारखेपासून २१ ऑगस्ट १९८९ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत वाढविण्यात आलेली आहे आणि **शासकीय राजपत्रातील** अधिसुचनेद्वारे जी दोन वर्षा पेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता आणखी वाढविण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आले आहेत, अशी मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांची मुदत कोणत्याही वेळी समाप्त झाल्याचे मानण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेले त्या प्रकरणाचे सर्व उपबंध विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(२) याद्वारे आणखी असे घोषीत करण्यात येत आहे की, २२ ऑगस्ट १९८७ ते हा अधिनियम, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यन्तच्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीत कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांच्या तरतुदींशी विसंगत अशी केलेली कोणतीही कारवाई किंवा वसुली यांसह केलेली कोणतीही गोष्ट ही रद्दबातल असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत उक्त तरतुदींशी सुसंगत अशी केलेली कोणतीही गोष्ट ही, विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल."

## विवक्षित शेतकरी, ग्रामिण कारागीर, ग्रामीण मजूर व कामगार यांना ऋणग्रस्ततेपासून मुक्त करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी**, महाराष्ट्र राज्यातील विवक्षित शेतकरी, ग्रामिण कारागीर, ग्रामिण मजूर व कामगार यांना ऋणग्रस्थेतेपासून मुक्त करण्याची तरतूद करण्याकरिता राज्यपालांनी शीघ्र कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि त्या प्रयोजनासाठी त्यांनी महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अध्यादेश, १९७५ हा दिनांक २२ ऑगस्ट १९७५ रोजी प्रस्थापित केला.

१९७५ चा महाराष्ट्र ध्यादेश ७

**आणि ज्याअर्थी**, ऋणग्रस्ततेपासूनची मुक्तता ही केवळ ऋणांमधून उद्‌भवणाऱ्या दायित्वापुरतीच निर्बंधित असावी, आणि ज्यांचे बाजारमुल्य वीस हजार रुपयांहून अधिक नाही अशा स्थावर मालमत्ता धारण करणाऱ्या कामगारांची ऋणे परिसमापित करण्यात यावीत, आणि जिचे बाजारमुल्य वीस हजार रुपयांहून अधिक आहे, परंतु चाळीस हजार रुपयांहून अधिक होत नाही अशी मालमत्ता धारण करणाऱ्या कामगारांच्या ऋणाबाबत तात्पुरत्या कालावधीसाठी अधिस्थगन मिळावे असे आता वाटते.

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे, वरील प्रयोजने आणि यात यापुढे दिलेली इतर प्रयोजने साध्य करण्यासाठी यात यापुढे दिल्याप्रमाणे त्यात सुधारणा केल्यानंतर, राज्य विधान मंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;

[१] [**आणि ज्याअर्थी**, विवक्षित शेतकरी, ग्रामिण कारागीर, ग्रामिण मजूर व कामगार यांच्या ऋणांचे समायोजन करणे अणि त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे;].

**त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

---

१. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ अन्वये हा परिच्छेद समाविष्ठ करण्यात आला.

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती [1][व प्रारंभ.]

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो २२ ऑगस्ट १९७५ रोजी अंमलात आला असे मानण्यात येईल.

* * * * *

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(अ) "शेतकरी" म्हणजे, जातीने जमीन कसणारी व्यक्ती;

(ब) "नियत दिवस" म्हणजे, २२ ऑगस्ट १९७५;

(क) "दिवाणी न्यायालय" या संज्ञेमध्ये लघुवाद न्यायालयाचा अंतर्भाव होतो;

(ड) "महानगरपालिका क्षेत्र" म्हणजे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये रचना करण्यात आलेल्या किंवा स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या अधिकारितेतील क्षेत्र;

(ई) "ऋण" म्हणजे, नियत दिवशी देय असणारे, कर्जातून निर्माण झालेले (कामगाराने कर्ज घेतलेले असल्यास, व्याजासह आणि इतर कोणत्याही बाबतीत व्याजासह किंवा व्याजाशिवाय) ऋणकोकडून रोखीने किंवा वस्तुरुपाने देय असणारे कोणतेही दायित्व, मग ते तारणावर दिलेले असो किंवा तारणरहित असो, तसेच ते कोणत्याही न्यायालयाच्या हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली देय असो किंवा अन्यथा देय असो;

(फ) "ऋणको" म्हणजे, १ ऑगस्ट १९७५ च्या लगतपूर्वीच्या वर्षातील ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न दोन हार चारशे रुपयांहून अधिक नव्हते असा सीमांतिक शेतकरी, ग्रामीण कारागीर किंवा ग्रामीण मजूर आणि नागरी क्षेत्रात राहात असल्यास, ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न सहा हजार रुपयांहून अधिक नव्हते आणि अन्यत्र राहात असल्यास, चार हजार आठशे रुपयांहून अधिक नव्हते, असा कामगार;

(ग) त्यांच्या व्याकरणिक रुपभेदांसह "जमिन धारण करणे" व त्याचे सजातीय शब्दप्रयोग म्हणजे, मालक म्हणून किंवा कूळ म्हणून (शासकीय पट्टेदारासह) जमिनीचा ताबा कायदेशीरपणे प्रत्यक्षात धारण करणे आणि "धारण जमीन" या शब्दप्रयोगाचा अर्थ तदनुसार लावण्यात येईल;

(ह) "सीमान्तिक शेतकरी" म्हणजे, ओलिताखाली नसलेली एक हेक्टरपेक्षा अधिक नसेल एवढी जमीन धारण करणारा शेतकरी आणि यात, कूळ म्हणून किंवा पिकातील हिस्सेदार म्हणून ओलिताखाली नसलेला एक हेक्टरपेक्षा अधिक नसेल एवढी जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याचा समावेश होतो;

---

[1] वरिल अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये "प्रारंभ व मुदत" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम ३ (अ) अन्वये पोट-कलम (४) वगळण्यात आले.

(आय) "कुटुंबातील व्यक्ती" म्हणजे, वडिल, आई, बायको/नवरा, भाऊ, अविवाहित अवलंबित बहीण, घटस्फोटित व अवलंबित बहीण, मुलगा, मुलाची बायको, किंवा अविवाहित मुलगी, घटस्फोटित व अवलंबित मुलगी, मुलाचा मुलगा, मुलाची अविवाहित मुलगी, मुलाची घटस्फोटित व अवलंबित मुलगी, आणि त्यात, त्याच्याबरोबर राहणाऱ्या व स्वतःच्या निर्वाहासाठी ऋणकोवर प्रत्यक्ष अवलंबून असणाऱ्या कोणत्याही नातेवाईकाचा अंतर्भाव होतो;

(ज) "ग्रामीण क्षेत्र" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत त्या त्या वेळी असणारे क्षेत्र आणि त्यात महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये वर्गीकरण केल्याप्रमाणे कोणत्याही "ब" वर्गीय किंवा "क" वर्गीय नगरपालिका क्षेत्राचा अंतर्भाव होतो, परंतु छावणी अधिनियम, १९२४ अन्वये व्याख्या केलेल्या पुणे, खडकी व कामठी छावण्यांच्या हद्दीतील क्षेत्राचा अंतर्भाव होत नाही; १९६२ चा महा. ५. १९६५ चा महा. ४०. १९२४ चा २

(के) "ग्रामिण कारागीर" म्हणजे, मुख्यतः ग्रामिण क्षेत्रात एकतर स्वतःच्या श्रमाने किंवा स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तींच्या श्रमाच्या साहाय्याने कोणताही शिल्प व्यवसाय करुन आपली उपजीविका करणारी व्यक्ती, परंतु त्यात नागरी क्षेत्रात राहणाऱ्या कारागिराचा अंतर्भाव होत नाही;

(ल) "ग्रामिण मजूर" म्हणजे,

(एक) ग्रामीण क्षेत्रात कोणतीही जमीन धारण न करणारी व्यक्ती,

(दोन) जिचे तेथे एखादे घर असेल किंवा नसेल अशी व्यक्ती, आणि

(तीन) मुख्यतः शारीरिक श्रम करुन आपली उपजीविका करणारी व्यक्ती,

परंतु त्यात, नागरी क्षेत्रात राहणाऱ्या अशा कोणत्याही कामगाराचा व ग्रामीण कारागिराचा अंतर्भाव होत नाही;

(म) "लहान शेतकरी" म्हणजे, ओलिताखाली नसलेली एक हेक्टरपेक्षा अधिक परंतु अशा प्रकारची दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण करणारा आणि अशी जमीन स्वतः कसणारा शेतकरी आणि त्यात, कूळ म्हणून किंवा पिकातील हिस्सेदार म्हणून ओलिताखाली नसलेली एक हेक्टरपेक्षा अधिक परंतु, अशा प्रकारची दोन हेक्टरपेक्षा अधिक नसेल एवढी जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याचा समावेश होतो;

**स्पष्टीकरण एक.-** अनुसूचित जात, अनुसूचित जमात, भटकी जमात किंवा विमुक्त जाती यांमधील व्यक्ती ही पूर्वोक्तप्रमाणे तिने धारण केलेल्या आणि ती कसत असलेल्या ओलिताखाली नसलेल्या जमिनीची मर्यादा लक्षात न घेता लहान शेतकरी, असल्याचे मानण्यात येईल;

**स्पष्टीकरण दोन.-** "भटक्या जमाती" व "विमुक्त जाती" म्हणजे, राज्य शासनाने वेळोवेळी भटक्या जमाती व विमुक्त जाती, म्हणून निर्धारित केल्याप्रमाणे असणाऱ्या भटक्या जमाती व विमुक्त जाती;

(न) "नागरी क्षेत्र" म्हणजे, महानगरपालिका क्षेत्र किंवा राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिकेच्या हद्दीमध्ये असणारे क्षेत्र, आणि त्यात, छावणी अधिनियम, १९२४ अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे पुणे, खडकी व कामठी छावण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या क्षेत्राचा समावेश होतो, परंतु त्यात महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये वर्गीकरण केल्याप्रमाणे कोणत्याही "ब" वर्गीय किंवा "क" वर्गीय नगरपालिका क्षेत्राचा अंतर्भाव होत नाही; १९२४ चा २ १९६५ चा महा. ४०.

(ओ) "कामगार" म्हणजे, कोणताही व्यवसाय, आजीविका किंवा व्यापार याद्वारे आपली उपजीविका करणारी व्यक्ती, तसेच कोणत्याही कारखान्यात काम करणारी (त्यातील बदली कामगारांसह) व्यक्ती,

**स्पष्टीकरण.**- या खंडामध्ये.—

१९४८ चा ६३. (१) "कारखाना" या शब्दप्रयोगाचा अर्थ, कारखाना अधिनियम, १९४८ यामध्ये त्याला नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे राहील, परंतु त्यात तेथे काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येवरील मर्यादा काढून टाकून फेरबदल केला जाईल;

(२) "बदली कामगार" म्हणजे, ज्याला बदली पत्रक देण्यात आले आहे आणि तात्पुरत्या अनुपस्थित असलेल्या व कारखान्याच्या हजेरीपटावर नाव असणाऱ्या दुसऱ्या कामगाराच्या ऐवजी ज्याला कारखान्यात कामावर घेतले आहे असा कामगार;

(३) संशय टाळण्यासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, "व्यवसाय आजीविका किंवा व्यापार" या शब्दप्रयोगात "रोजगार" या संज्ञेचा अंतर्भाव करण्यात येईल आणि तो नेहमीच अंतर्भूत करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्या शब्दप्रयोगाचा अर्थ तदनुसार लावण्यात येईल;

१९६१ चा महा. २६. (पी) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचे अर्थ अनुक्रमे महाराष्ट्र शेतजमीन (धारण जमिनीवरील कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यामध्ये त्यांना नेमून देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणे असतील.

## प्रकरण दोन

## ऋणांचे पुनरुज्जीवन

१९७५ चा महा. अध्या. ७. **३.** महाराष्ट्र ऋणगस्ततेपासून मुक्तता अध्यादेश, १९७५, यात काहीही अंतर्भूत असले तरी त्या अध्यादेशाच्या तरतुदीअन्वये नियत दिवशी मुक्त झालेली ऋणकोची सर्व ऋणे ही या अधिनियमाच्या प्रारंभानंतर पुनरुज्जीवित होतील; आणि तदनुसार यात तरतूद केल्याप्रमाणे, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या उक्त अध्यादेशाच्या तरतुदी ह्या जणू नियत दिवशी त्या तरतुदींची नेहमीसाठी सुधारणा करण्यात आली होती व त्या प्रवर्तनात होत्या अशा रीतीने पुनरुज्जीवित ऋणांच्या संबंधात प्रवर्तनात येतील. सन १९७५ चा अध्यादेश क्रमांक ७ खालील सर्व मुक्त ऋणांचे पुनरुज्जीवन.

## प्रकरण तीन

## विवक्षित ऋणांचे परिसमापन

विविक्षित ऋणांपासून मुक्तता व तिचे परिणाम.

४. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत किंवा अशा विधीच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही करारात किंवा इतर लेखात कांहीही अंतर्भूत असले तरी, आणि या अधिनियमात स्पष्टपणे अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त जिचे बाजारमूल्य वीस हजार रुपयांपेक्षा अधिक नाही अशी स्थावर मालमत्ता कोणतीही असल्यास धारण करणाऱ्या कामगारांच्या प्रत्येक ऋणांची आणि इतर कोणत्याही ऋणकोकडून धनकोला देय असलेल्या, व्याजाची रक्कम, कोणतीही असल्यास, ती धरून, नियत दिवसापूर्वी अदत्त असलेल्या प्रत्येक ऋणाची पूर्ण फेड झाली असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानंतर, यात यापुढे दिलेले परिणाम, नियत दिवसापासून घडून येतील : —

(अ) नियत दिवशी एखाद्या ऋणकोकडून देय असलेले असे कोणतेही ऋण, त्याच्याकडून किंवा त्याच्या मालकीच्या कोणत्याही जंगम किंवा स्थावर मालमत्तेमधून किंवा मालमत्तेच्या बदली वसुली योग्य नसेल किंवा अशी कोणतीही मालमत्ता जप्त करण्यास आणि विकण्यास किंवा ऋणकोंच्या विरुध्द अशा ऋणांशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करताना कोणत्याही रीतीने त्याविरुध्द कार्यवाही केली जाण्यास पात्र नसेल;

(ब) कोणतेही दिवाणी न्यायालय, व्याज, कोणतेही असल्यास, ते धरुन अशा ऋणांच्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी अशा ऋणकोविरुध्द कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करुन घेणार नाही;

परंतु अशा कोणत्याही ऋणकोविरुध्द किंवा इतर कोणत्याही व्यक्तीविरुध्द एखादा दावा किंवा कार्यवाही संयुक्तपणे दाखल करण्यात आली असेल त्या बाबतीत, या खंडातील कोणतीही गोष्ट, अशा इतर व्यक्तीशी संबंधित असेल तेथवर असा दावा किंवा कार्यवाही टिकण्यासारखी आहे किंवा नाही, याबाबत लागू होणार नाही.

(क) अशा ऋणकोविरुध्द अशा कोणत्याही ऋणांच्या वसुलीसाठी नियत दिवशी प्रलंबित असलेले सर्व दावे आणि कार्यवाह्या (अपिले, पुनरीक्षणे, जप्ती किंवा अंमलबजावणीची कार्यवाही यांसह) समाप्त होतील :

परंतु, या खंडातील कोणतीही गोष्ट पुढील विक्रीस लागू होणार नाही—

(एक) नियत दिवसांपूर्वी सुरु आणि समाप्त केलेली कोणत्याही जंगम मालमत्तेची विक्री;

(दोन) अशा दिवसापूर्वी कायम केलेली कोणत्याही स्थावर मालमत्तेची विक्री;

(ड) अशा कोणत्याही ऋणांच्या संबंधात एखाद्या दिवाणी न्यायालयाकडून त्याच्याविरुध्द संमत करण्यात आलेल्या पैशाच्या कोणत्याही हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना एखाद्या दिवाणी कारागृहात स्थानबध्दता भोगणाऱ्या प्रत्येक ऋणकोची सुटका करण्यात येईल;

(ई) अशा ऋणकोने तारण म्हणून दिलेली किंवा गहाण ठेवलेली प्रत्येक मालमत्ता अशा ऋणकोच्या पक्षी मुक्त करण्यात येईल आणि त्याबाबतीत ऋणकोने लेखी अर्ज केल्यावर ती मालमत्ता ऋणकोला ताबडतोब परत देणे, हे धनकोवर बंधनकारक असेल, आणि धनको अर्ज मिळाल्याची पावती ऋणकोला पाठवील. धनकोने पावती पाठविण्यास नकार दिल्यास, ऋणकोस कलम ६ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांच्या किंवा त्याच्याकडून त्याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या दिनांकानिशी असलेल्या सहीने तशा अर्थाचा अर्ज पृष्ठांकित करता येईल.

**स्पष्टीकरण १.**—ऋणकोने नियत दिवसापूर्वी आधीच परतफेड केलेल्या किंवा त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेल्या ऋणाच्या कोणत्याही भागाचा परतावा मिळण्यास असा कोणताही ऋणको हक्कदार असेल असा या कलमातील कोणत्याही गोष्टीचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण २.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "कामगाराचे ऋण" या शब्दप्रयोगामध्ये एकापेक्षा अधिक धनकोंकडून घेतलेल्या कर्जामधून उद्‌भवणाऱ्या ऋणांचा समावेश होतो.

५. (१) कोणताही धनको, त्यांच्याकडे तारण किंवा गहाण ठेवलेल्या मालमत्तेस किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कागदपत्रास नियत दिनांकानंतर हानी पोचवणार नाही, तिचा नाश करणार नाही किंवा त्यांमध्ये अनधिकृत फिरवाफिरव करणार नाही किंवा ती आपल्यापासून दूर करणार नाही किंवा या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे असेल ते खेरीज करुन त्याबाबत इतर प्रकारे व्यवहार करणार नाही. तारण दिलेली मालमत्ता, इत्यादीच्या विल्हेवाटीस मनाई आणि शास्ती.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अपराधसिध्दीनंतर तीन वर्षांपर्यंत वाढवता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाच्या एतद्‌विरुध्द विशेष आणि पुरेशा कारणांच्या अभावी, असा कारावास सहा महिन्यापेक्षा कमी व दंड दोनशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

६. कलम ४, खंड (ई) अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे मालमत्ता ऋणकोस ताबडतोब परत करण्याबाबत एखादा धनको कसूर करील त्याबाबतीत आणि मालमत्तेचा कब्जा घेण्याच्या कामी ऋणकोस विरोध केला जात असेल किंवा व्यत्यय आणला जात असेल, तर ऋणकोस, कलम ७ च्या तरतुदीस अधीन राहून, अशा मालमत्तेचा कब्जा देण्यास भाग पाडण्याची विनंती,जेथे पोलीस आयुक्त असेल तेथे पोलीस आयुक्तास आणि इतरत्र, जिल्हा दंडाधिकाऱ्यास किंवा पोलीस अधीक्षकास करता येईल. पोलीस आयुक्त, जिल्हादंडाधिकारी किंवा यथास्थिति पोलीस अधीक्षक ऋणकोला मालमत्तेचा कब्जा देण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असेल अशी उपाययोजना किंवा अशा बलाचा वापर करील किंवा करण्याची तजवीज करील. मालमत्तेचा कब्जा ऋणकोला देणे भाग पाडण्याचा विवक्षित अधिकाऱ्यांचा अधिकार.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) पोलीस आयुक्त, यामध्ये त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या, निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ब) जिल्हा दंडाधिकारी, यामध्ये त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या, तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ; आणि

(क) पोलीस अधीक्षक, यामध्ये त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या, फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो.

७. (१) कलम ४ च्या तरतुदी कार्यान्वित करताना, धनकोने, त्याचा ऋणको असल्याची हक्क मागणी सांगणारी व्यक्ती ही सीमांतिक शेतकरी, ग्रामीण कारागीर, ग्रामीण मजूर किंवा यथास्थिती, कामगार नाही, असा प्रश्न उपस्थित केला किंवा कामगाराची स्थावर मालमत्ता, कोणतीही असल्यास, तिच्या मूल्यनिर्धारणासह इतर कोणत्याही कारणास्तव, या अधिनियमान्वये मुक्ततेसाठी असलेल्या ऋणकोच्या पात्रतेबाबत विवाद उपस्थित केला तर धनको, याबाबतीत जिल्हा दंडाधिकाऱ्याने लेखी आदेशाद्वारे रीतसर नेमलेल्या, अपर तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा अधिकाऱ्याकडे (किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या मते जो त्याच दर्जाचा असेल अशा कोणत्याही विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याकडे) (यात यापुढे याचा "प्राधिकृत अधिकारी" असा निर्देश केला आहे) लेखी अर्ज करील. धनकोस ऋणकोच्या हक्कमागणीबाबत विवाद उपस्थित करता येईल.

(२) त्या अर्जामध्ये प्रकरणातील तथ्ये थोडक्यात नमूद करण्यात येतील व प्राधिकृत अधिकाऱ्याच्या निर्णयासाठी उपस्थित केलेला मुद्दा नमूद करण्यात येईल ; आणि तो अर्ज कलम ४ च्या खंड (ई) अन्वये धनकोंकडून अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून किंवा त्या खंडान्वये अर्जावर पृष्ठांकन झाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत करण्यात येईल.

(३) धनकोने, तारण ठेवलेली मालमत्ता किंवा अशा तारणाच्या पुराव्यादाखल असलेले कोणतेही कागदपत्र किंवा दोन्ही किंवा अशा मालमत्तेचे मूल्य अनामत ठेवल्याशिवाय प्राधिकृत अधिकारी या कलमान्वये कोणताही अर्ज स्वीकारणार नाही. कोणत्याही कारणासाठी धनकोकडे मालमत्ता उपलब्ध नसेल त्याबाबतीत तो मालमत्ता उपलब्ध नसल्याची कारणे नमूद केलेले शपथपत्र करुन देईल.

(४) या कलमाखालील सर्व कार्यवाह्यांमध्ये प्राधिकृत अधिकारी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये संक्षिप्त चौकशीकरिता तरतूद केलेली कार्यपध्दती अनुसरील. १९६६ चा महा. ४१.

(५) या कलमाच्या प्रयोजनांसाठी ऋणको असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीने, कोणताही विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तलाठी, पोलीस पाटील किंवा ग्रामपंचायतीचा सरपंच किंवा राज्य शासनाने याबाबतीत वेळोवेळी काढलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणतीही व्यक्ती यांच्याकडून घेतलेले अशा प्रमाणपत्रामध्ये वर्णन केलेला ऋणको ती स्वतः आहे, असे प्रमाणपत्र सादर केले असेल तर, तद्विरुध्द सिध्द करण्यात न आल्यास प्राधिकृत अधिकाऱ्याकडून ती ऋणको असल्याचे मानण्यात येईल. राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा नमुन्यात हे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रमाणपत्र देणारा प्राधिकारी असे प्रमाणपत्र देण्यापूर्वी धनकोचे म्हणणे ऐकूण घेणार नाही.

(६) धनकोने आपल्या अर्जामध्ये उपस्थित केलेला प्रश्न किंवा विवाद यांच्या संबंधातील किंवा त्यांच्याशी संबंध्द अशा सर्व प्रश्नांचा निर्णय देण्याची शक्ती, प्राधिकृत अधिकाऱ्यास असेल व तद्नुसार, त्याला मालमत्तेची मर्यादा किंवा यथास्थिति मूल्य निर्धारित करता येईल, तारण दिलेल्या मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेकरिता निदेश देता येतील आणि या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी व ते कार्यान्वित करण्यासाठी प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असतील असे आदेश काढता येतील. कोणत्याही स्थावर मालमत्तेचे मूल्य निर्धारित करण्यासाठी तज्ञाच्या सेवांचे सहाय्य प्राधिकृत अधिकाऱ्याने घेणे हे विधिसंमत असेल ; आणि मानधन देण्याबद्दलचे कलम ९, पोट-कलम (३) च्या तरतुदी अशा प्रदानास लागू होतील.

(७) या कलमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज, धनकोस आणि ऋणकोस आपापले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली असल्याखेरीज, प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून या कलमान्वये कोणत्याही प्रश्नाचा निर्णय देण्यात येणार नाही.

(८) प्राधिकृत अधिकारी, या कलमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रश्नाचा निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम आणि निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही दिवाणी न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही. जर मालमत्ता किंवा तिचे मूल्य प्राधिकृत अधिकाऱ्याच्या कब्जात असेल आणि निर्णय ऋणकोस अनुकूल असा असेल तर, ती ते ताबडतोब ऋणकोच्या स्वाधीन करण्यात येईल ; आणि तो अधिकारी मालमत्ता किंवा तिचे मूल्य ऋणकोच्या स्वाधीन करण्यात आले आहे, असे पृष्ठांकन आदेशावर करील.

प्रवेश करण्याचा आणि झडती घेण्याचा अधिकार.

८. (१) या प्रकरणाच्या तरतूदी अंमलात आणण्यासाठी कलम ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही ऋणकोची मालमत्ता किंवा कोणत्याही ऋणकोला दिलेल्या कर्जासंबंधी व्यवहाराच्या पुराव्यादाखल असलेले कोणतेही दस्तऐवज ज्या ठिकाणी ठेवलेले किंवा लपवलेले आहेत असे मानण्यास त्यास कारण असेल अशा कोणत्याही जागेमध्ये अधिपत्राशिवाय प्रवेश करता येईल व झडती घेता येईल आणि अशी मालमत्ता किंवा दस्तऐवज जप्त करता

येतील व ती त्यास योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत स्वतःच्या अभिरक्षेत ठेवून घेता येतील, मालमत्ता ऋणकोच्या स्वाधीन करण्यात आली नाही, तर ज्यांच्या अभिरक्षेतून ती जप्त करण्यात आली असेल त्या धनकोकडे ती परत करण्यात येईल.

१९७४ चा २. (२) पोट-कलम (१) मध्ये तरतूद केली असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या इतर तरतुदी त्या जेथवर लागू होतील तेथवर, उक्त संहितेच्या तरतुदीनुसार घेतलेल्या कोणत्याही झडतीस किंवा केलेल्या कोणत्याही जप्तीस ज्याप्रमाणे लागू होतील त्याच प्रमाणे अशा झडतीस किंवा जप्तीस लागू होतील.

विवक्षित प्रकरणांमध्ये तारण दिलेल्या मालमत्तेचे मूल्य धनकोने देण आवश्यक असणे.

**९.** (१) ऋणकोने तारण दिलेल्या मालमत्तेचा कब्जा कोणत्याही कारणासाठी (तिची ओळख न पटण्याच्या कारणासह) त्याला देता येणे शक्य नसेल, तर, धनको अशा मालमत्तेचे मूल्य ऋणकोस देईल. मालमत्तेचे मूल्य हे तिचे बाजार मूल्य असेल, आणि मालमत्तेची ओळख, त्याबाबतीत योग्य ती चौकशी केल्यानंतर, निर्धारित करण्यात येईल, धनकोने मूल्य देण्यात कसूर केल्यास ते त्यांच्याकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल ; आणि मूल्याची वसुली झाल्यानंतर ते, अशी मालमत्ता ज्याच्याकडून तारण देण्यात आली होती त्या ऋणकोच्या स्वाधीन, करण्यात येईल.

(२) जर, मालमत्तेचे मूल्य किंवा तिची ओळख यांच्या प्रश्नावर धनको आणि ऋणको यांच्या मध्ये मतभेद असतील तर तो प्रश्न प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे, निर्णयासाठी निर्दिष्ट करण्यात येईल आणि त्या प्रश्नावर त्याने दिलेला निर्णय हा अंतिम असेल.

(३) मालमत्तेचे मूल्य त्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञाच्या सेवेच्या सहाय्याने निर्धारित करता येईल. त्या तज्ञाला राज्य शासन किंवा त्याने नियुक्त केलेल्या तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी, कोणत्याही क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या संबंधात वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे निर्धारित करील असे मानधन देता येईल.

शुल्लक किंवा तापदायक अर्जांसाठी दंड लादण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार,

**१०.** कलम ७ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याला सादर केलेला अर्ज फेटाळण्यात आला असेल, आणि तो अर्ज क्षुल्लक किंवा तापदायक असल्याबद्दल प्राधिकृत अधिकाऱ्यांची खात्री झाली असेल अशा बाबतीत, त्या प्राधिकृत अधिकाऱ्याला त्या धनकोवर लेखी आदेशाद्वारे, शंभर रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या रकमेचा दंड लादता येईल. जर त्या धनकोने आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसाच्या आत असा दंड भरण्यास कसूर केली तर, जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे ती त्याच्याकडून वसूल करता येईल.

अधिकारितेस रोध.

**११.** (१) या प्रकरणान्वये किंवा त्याखाली प्राधिकृत अधिकाऱ्याने तडजोड करणे, निर्णय देणे, किंवा कार्यवाही, करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रश्नावर तडजोड करणे, निर्णय देणे किंवा कार्यवाही करणे याबाबतीत कोणत्याही दिवाणी न्यायालयाला अधिकारिता असणार नाही.

(२) राज्य शासनाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने या प्रकरणान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशावर कोणत्याही न्यायालयामध्ये आक्षेप घेण्यात येणार नाही.

ज्यामध्ये या अधिनियमाखाली निर्णय देणे आवश्यक आहे, अशा वादप्रश्नांचा अंतर्भाव असलेले दावे.

**१२.** (१) कोणत्याही दिवाणी न्यायालयामध्ये दाखल केलेल्या एखाद्या दाव्यामध्ये ज्यांची तडजोड, निर्णय, किंवा कार्यवाही या अधिनियमाखाली प्राधिकृत अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे. अशा कोणत्याही वादप्रश्नांचा अंतर्भाव असेल त्याबाबतीत, ते दिवाणी, न्यायालय तो दावा स्थगित करील आणि असे वादप्रश्न निर्णीतीसाठी प्राधिकृत अधिकाऱ्याकडे निर्दिष्ट करील.

(२) दिवाणी न्यायालयाकडून असा निर्देश मिळाल्यावर, प्राधिकृत अधिकारी, अशा वादप्रश्नावर कार्यवाही करील आणि या प्रकरणाच्या तरतुदीनुसार त्याचा निर्णय देईल आणि त्या दिवाणी न्यायालयाला आपला निर्णय कळवील, आणि असे न्यायालय त्यानंतर प्रयोज्य कार्यवाहीनुसार तो दावा निकालात काढील.

ऋणाच्या ऐवजी श्रमाचा करारनामा निरर्थक ठरणे.

**१३.** ज्या अन्वये किंवा ज्यांच्या आधारे एखाद्या ऋणकोला किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला मजूर म्हणून किंवा अन्यथा धनकोसाठी काम करणे भाग पडत असेल, अशी कोणतीही रुढी किंवा परंपरा किंवा कोणताही करारनामा (मग तो नियत दिवसापूर्वी किंवा त्यानंतर केलेला असो) निरर्थक ठरेल, आणि परिणामक होणार नाही आणि कोणत्याही दिवाणी न्यायालयाद्वारे कधीही अंमलात आणण्यात येणार नाही.

## प्रकरण चार

### कामगारांच्या ऋणांवरील अधिस्थगन

विवक्षित प्रकरणांमध्ये कामगारांच्या ऋणांवरील अधिस्थगन.

**१४.** (१) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत किंवा अशा कोणत्याही विधीच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही करारात किंवा इतर लेखात काहीही अंतर्भूत असले तरी, व्याजासह वीस हजार रुपयांपेक्षा अधिक व चाळीस हजार रुपयांपेक्षा अधिक नाही, एवढे बाजारी मूल्य असलेली स्थावर मालमत्ता धारण करणाऱ्या कोणत्याही कामगारांचे, नियत दिवशी अदत्त असलेले कोणतेही ऋण असल्यास, ते नियत दिवशी चुकते झालेले असणार नाही किंवा चुकते झाले असल्याचे मानण्यात येणार नाही आणि येथे यापूर्वी तरतूद करण्यात आली असेल तेवढे खेरीज करुन एरव्ही अशी सर्व ऋणे कलम ३ अन्वये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे पुनरुज्जीवित होतील आणि ती संपूर्णपणे फेडण्यात येईपर्यंत अस्तित्वात असण्याचे चालू राहीले परंतु तरीसुध्दा अशा कोणत्याही ऋणांचे प्रदान किंवा वसुली या कलमाच्या तरतुदीच्या अधीन, राहून [1][ हे प्रकरण अंमलात असेल त्या कालावधीमध्ये ] स्थगित राहील, आणि, कोणत्याही धनकोने नियत दिवशी अदत्त असलेले असे कोणतेही ऋण किंवा त्याचा कोणताही भाग किंवा कोणतेही व्याज अशा कालावधीमध्ये वसूल करणे विधिसंमत असणार नाही, आणि प्रकरण पाच च्या तरतुदी लहान शेतकऱ्यांविरुध्दच्या हुकमनाम्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत जशा लागू होतात, तशा त्या अशा कामगारांच्या अशा ऋणांच्या संबंधातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीतही लागू होतील.

(२) [2][ या प्रकरणांच्या समाप्तीनंतर ] कामगाराकडील वसूल करावयाची ऋणाची रक्कम ही मुद्दलांच्या रकमेच्या १५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(३) हे प्रकरण प्रवर्तनात असेल त्या कालावधीमध्ये कामागारांच्या ऋणाच्या कोणत्याही रकमेवर व्याज उपार्जित होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी "कामगाराचे ऋण" या शब्दप्रयोगामध्ये एकापेक्षा अधिक धनकोकडून काढलेल्या कर्जामधून उद्‌भवणाऱ्या ऋणाचाही अंतर्भाव होतो.

---

[1]. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १८, कलम ४ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]. वरील अधिनियमांच्या कलम ४ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

¹[१४ अ. हे प्रकरण व प्रकरण पाचही, या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या प्रवर्तनास बाध येऊ न देता २२ ऑगस्ट १९७५ पासून सुरु होणाऱ्या आणि ²[२१ ऑगस्ट १९८९ हा दिवस धरुन त्या दिवशी संपणाऱ्या] एवढ्या मुदतीसाठी व राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे त्यानंतरच्या दोन वर्षापेक्षा अधिक नसणाऱ्या आणखी मुदतीसाठी अंमलात राहतील आणि त्यानंतर ती अंमलात असणे समाप्त होईल. मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ यांचे कलम ७ हे जणू काही ती प्रकरणे महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आली असल्याप्रमाणे, ही प्रकरणे अंमलात असणे समाप्त झाल्यानंतर लागू होईल.]

प्रकरणे चार व पाच अंमलात असण्याचा तात्पुरता अवधी.

१९०४ चा मुंबई १.

## प्रकरण पाच

### लहान शेतकऱ्यांविरुध्दच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीवरील अधिस्थगन

**१५.** (१) पैशाच्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीची सर्व कार्यवाही, किंवा पुरोबंधाच्या किंवा विक्रीच्या कोणत्याही प्रारंभिक हुकूमनाम्याला अंतिम स्वरुप देण्याची कार्यवाही किंवा जिच्यामध्ये नियत दिवशी न्यायनिर्णित ऋणको किंवा यथास्थिती प्रतिवादी लहान शेतकरी असेल अशा नियत दिवसापूर्वी पत्करण्यात आलेल्या ऋणाच्या संबंधातील कोणत्याही दायित्वाच्या आधारावर दिवाणी न्यायालयाने संमत केलेल्या, विक्रीच्या कोणत्याही अंतिम हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही ³[हे प्रकरण अंमलात असेल त्या मुदतीत] याबाबतीत त्याने अर्ज केल्यानंतर अशा न्यायनिर्णित ऋणकोविरुध्द किंवा प्रतिवादी विरुध्द, स्थगित करण्यात येईल.

विवक्षित हुकूमनाम्याच्या बाबतीत कार्यवाही स्थगित करणे.

(२) ज्याची अंमलबजावणी पोट-कलम (१) अन्वये स्थगित करण्यात आली असेल आणि ज्या तारखेस स्थगिती आदेश संमत करण्यात आला असेल त्या तारखेस अस्तित्वात असलेल्या पैशाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या उभ्या पिकाच्या, शेतीच्या उत्पादनाच्या, पशुधनाच्या, आणि नाशिवंत स्वरुपाच्या इतर जंगम मालमत्तेच्या सर्व जप्त्या काढून घेण्यात येतील.

(३) जो लहान शेतकरी असेल असा कोणताही न्यानिर्णित ऋणको किंवा प्रतिवादी, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरुपाच्या कोणत्याही कार्यवाह्या त्याच्याविरुध्द प्रलंबित नसल्या तरी, त्या पोट-कलमान्वये स्थगनासाठी अर्ज करील.

(४) या पोट-कलमान्वये न्यायालयाने संमत केलेल्या प्रत्येक स्थगन आदेशाचा न्यायनिर्णित ऋणकोने किंवा यथास्थिती, प्रतिवादीने दाखल केलेल्या स्थगन अर्जाच्या तारखेशी पूर्वलक्षी संबंध स्थापित होईल आणि या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी, कार्यवाही अशा तारखेपासून स्थगित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**१६.** **(१)** नियत दिवशी आपल्या ऋणांच्या संबंधात दिवाणी न्यायालयाने पैशांसाठी काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दिवाणी कारागृहात स्थानबध्दता भोगत असलेल्या प्रत्येक लहान शेतकऱ्याची सुटका करण्यात येईल.

दिवाणी कारागृहात स्थानबध्द असलेल्या व्यक्तींची सुटका.

(२) ⁴[हे प्रकरण अंमलात असेल त्या मुदतीत] कोणताही लहान शेतकरी, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना कोणत्याही प्रकरणात अटक केली जाण्यास किंवा दिवाणी कारागृहात स्थानबध्द ठेवला जाण्यास पात्र असणार नाही.

---

१. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ कलम ५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम २ अन्वये "२१ ऑगस्ट १९८५ हा दिवस धरुन त्या दिवशी संपणाऱ्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ अन्वये "हा अधिनियम अंमलात असेल त्या मुदतीत" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये "हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

हप्ते भरण्यात कसूर केल्याबद्दल सूट.

१७. (१) हुकूमनाम्याची रक्कम हप्त्यांनी देण्याच्या हुकूमनाम्यात जर अशी तरतूद अंतर्भूत असेल की जर एक किंवा अधिक हप्ते भरण्यात कसूर झाली तर संपूर्ण रक्कम एकदम देय होईल, तर अशा तरतुदीत काहीही अंतर्भूत असले तरी [१][या प्रकरणात ] अंमलबजावणीची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आलेल्या कालावधीत देय असणारा हप्ता भरण्यात आला नाही तर, अशा तरतुदीच्या प्रयोजनार्थ ती कसूर असल्याचे समजण्यात येणार नाही.

(२) जर न्यायनिर्णीत ऋणकोने अशा तऱ्हेने देय असलेले हप्ते [२][या प्रकरणाच्या समाप्तीनंतर] बारा महिन्यांच्या आत भरले तर, असे हप्ते उचित दिनांकास भरले असल्याचे समजण्यात येईल.

अंमलबजावणीसाठी मुदतीची गणना करणे.

१८. मुदत अधिनियम, १९६३ द्वारे विहित केलेल्या बारा वर्षाच्या कालावधीची गणना करताना [३][या प्रकरणाखाली] ज्या मुदतीसाठी कार्यवाही स्थगित करण्यात आली असेल ती मुदत वगळण्यात येईल. १९६३ चा ३६.

विवक्षित हुकूमनाम्याच्या रकमा देणे.

१९. या प्रकरणातील कोणताही मजकूर –

(अ) विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असणाऱ्या हक्कमागण्यांमधून उद्‌भवणाऱ्या पैशासाठी किंवा संयुक्त कूळ किंवा संयुक्त मालक यांच्यापक्षी निर्वाहासाठी किंवा लाभासाठी किंवा दरम्यानच्या नफ्यासाठी किंवा नुकसानीसाठी किंवा अपकृत्यासाठी किंवा शेतजमिनीच्या संयुक्त कुळांमधील अंशदानासाठी असलेल्या हुकूमनाम्याला लागू होणार नाही ; किंवा

(ब) ज्याच्या आधारे असा हुकूमनामा मिळवण्यात आला असेल अशा गहाणास अधीन राहून गहाणाचे दायित्व पूर्ण करण्यासाठी ज्याने हस्तांतरण स्वीकारले असेल अशा नंतरच्या हस्तांतरितीच्या हाती असलेल्या मालमत्तेविरुध्दच्या गहाणाच्या हुकूमनाम्याला लागू होणार नाही.

(क) निबंधकाच्या किंवा निबंधकास सहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या किंवा निबंधकाने नियुक्त केलेल्या नामनिर्देशित व्यक्तीच्या किंवा नामनिर्देशित व्यक्तीच्या मंडळाच्या किंवा समापकांच्या किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी न्यायाधिकरणाच्या, सहकारी न्यायालयांच्या, सहकारी अपील न्यायालयाच्या किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० खालील किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाखालील इतर प्राधिकाऱ्यांच्या निर्णयास किंवा आदेशास किंवा निवाड्यास लागू होणार नाही. १९६१ चा महा. २४.

लहान शेतकऱ्यांनी केलेले हस्तांतरण निरर्थक ठरणे.

२०. ज्या लहान शेतकऱ्याविरुध्द [४][या प्रकरणान्वये ] अंमलबजावणीची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे, त्यांनी केलेले मालमत्तेचे प्रत्येक हस्तांतरण हे अशा लहान शेतकऱ्यांविरुध्दच्या ज्या धनकोची हक्कमागणी विफल करण्याजोगी ठरली असेल किंवा लांबणीवर टाकली गेली असेल त्याच्या विकल्पानुसार निरर्थक ठरेल.

---

[१]. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८ (अ) अन्वये ''या अधिनियमान्वये '' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२]. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) अन्वये ''या अधिनियमाच्या समाप्तीनंतर '' या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]. वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये ''या अधिनियमान्वये '' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४]. वरील अधिनियमाच्या कलम १० अन्वये ''या अधिनियमान्वये '' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

**२१.** (१) या प्रकरणाच्या समाप्तीनंतर कलम १५, पोट-कलम (१) अन्वये जी कार्यवाही स्थगित केली असेल अशा कोणत्याही कार्यवाहीमधून किंवा त्या कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये वर्णन केलेल्या ज्यांच्या संबंधात अंमलबजावणीची कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही अशा हुकूमनाम्यामधून उद्‌भवणारी कोणतीही हक्कमागणी मुद्दलाच्या रकमेच्या एकशे पन्नास टक्के यापेक्षा अधिक रकमेची असणार नाही. विवक्षित प्रकरणात हक्कमागणीच्या आणि व्याजाच्या रकमेवर निर्बंध.

(२) हे प्रकरण अंमलात असेल त्या मुदतीत पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही हक्कमागणीच्या संबंधात असलेल्या रकमेवर कोणतेही व्याज उपार्जित होणार नाही.

## [1][ प्रकरण पाच-अ

### विवक्षित शेतकरी व कामगार यांच्य ऋणांचे समायोजन

१९७९ चा महा. १८. **२२.** या प्रकरणाच्या तरतुदी महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता (सुधारणा) अधिनियम, १९७९ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून (या प्रकरणात यापुढे जिचा निर्देश "या प्रकरणाच्या प्रारंभाची तारीख" असा केला आहे) अंमलात येतील आणि प्रकरणे चार व पाच यामध्ये या तरतुदीशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, त्या अंमलात राहतील. प्रकरण पाच-अ चा प्रारंभ.

**२३.** या प्रकरणामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर.– व्याख्या.

(अ) "निवाडा" म्हणजे कलम २७ च्या पोट-कलम (४) अन्वये किंवा कलम ४१ अथवा ४२ अन्वये देण्यात आलेला किंवा अपिलामध्ये न्यायालयीन कायम केलेला किंवा फेरबदल केलेला निवाडा ;

(ब) "न्यायालय" म्हणजे .–

(एक) बृहन्मुंबईमध्ये, लघुवाद न्यायालय, मुंबई.

१८८७ चा ९. (दोन) ज्या कोणत्याही क्षेत्रासाठी प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ अन्वये लघुवाद न्यायालय स्थापन करण्यात आले असेल त्या क्षेत्रामध्ये असे न्यायालय, आणि

(तीन) इतरत्र, ऋणको सामान्यपणे जेथे राहत असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असणारा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांचे न्यायालय किंवा असे कोणतेही दिवाणी न्यायालय नसेल तर सर्वसाधारण अधिकारिता असणारा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय ;

(क) "ऋण" म्हणजे या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेस अदत्त असणारे, कर्जातून निर्माण झालेले (कामगाराने कर्ज घेतले असल्यास व्याजासह आणि इतर कोणत्याही बाबतीत व्याजासह किंवा व्याजाशिवाय) ऋणकोकडून रोखीने किंवा वस्तुरुपाने देय असणारे कोणतेही दायित्व, मग ते तारणावर दिलेले असो किंवा तारणरहित असो आणि तसेच ते कोणत्याही न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये किंवा अन्य प्रकारे द्यावयाचे असो.

(ड) "ऋणको" म्हणजे .–

(एक) जो कोणतेही ऋण देणे लागत असेल आणि या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या वर्षी ज्याचे सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न दोन हजार चारशे रुपयांपेक्षा, अधिक होते पण सहा हजार रुपयांपेक्षा अधिक नव्हते असा, कलम २ मध्ये व्याख्या केल्या प्रमाणे असलेला सीमांतिक, शेतकरी लहान शेतकरी, ग्रामीण कारागीर किंवा ग्रामीण मजूर.

---

[1]. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ११ अन्वये प्रकरण पाच-अ समाविष्ट करण्यात आले.

(दोन) कलम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला कामगार, जे कोणतेही ऋण देणे लागत असेल, आणि .—

(अ) तो नागरी क्षेत्रामध्ये राहत असल्यास, या प्रकणाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या वर्षी ज्याचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न सहा हजार रुपयापेक्षा अधिक होते पण ८ हजार रुपयापेक्षा अधिक नव्हेते किंवा तो इतरत्र राहत असल्यास, त्या वर्षी ते उत्पन्न चार हजार आठशे रुपयापेक्षा अधिक होते. पण सात हजार रुपयापेक्षा अधिक नव्हते ; किंवा

(ब) जो या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेस ज्या स्थावर मालमत्तेचे बाजार मूल्य वीस हजार रुपयापेक्षा अधिक असेल, पण चाळीस हजार रुपयापेक्षा अधिक नसेल अशी स्थावर मालमत्ता धारण करीत असेल ;

(तीन) जो कोणतेही ऋण देणे लागत असेल आणि या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेस जी दोन हेक्टरांपेक्षा अधिक पण चार हेक्टरांपेक्षा कमी असेल अशी ओलिताखाली नसलेली जमीन धारण करीत असेल अणि अशी जमीन जातीने कसत असेल असा शेतकरी किंवा जो कोणतेही ऋण देणे लागत असेल आणि या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेस दोन हेक्टरांपेक्षा अधिक पण चार हेक्टरांपेक्षा कमी असेल अशी ओलिताखाली नसलेली कोणतेही जमीन कूळ म्हणून किंवा पिकातील हिस्सेदार म्हणून कसत असेल व दोन्ही बाबतीत जमीन कोणत्याही अवर्षणप्रवण क्षेत्रामधील जमीन असेल असा शेतकरी ; किंवा

(चार) जिच्या ऋणांची वसुली कलम १४ अन्वये स्थगित करण्यात आली आहे किंवा जिच्या विरूध्दच्या कोणत्याही कार्यवाह्या कलम १५ अन्वये स्थगित करण्यात आल्या आहेत अशी इतर कोणतीही व्यक्ती ;

(ई) ''अवर्षणप्रवण'' क्षेत्र म्हणजे, भीषण अवर्षण, पूर किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे कोणत्याही क्षेत्रात किंवा क्षेत्रांत घडून आलेली आपत्ती लक्षात घेऊन राज्य शासन या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी वेळोवेळी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अवर्षणप्रवण क्षेत्र म्हणून घोषित करील, असे कोणतेही क्षेत्र किंवा अशी कोणतीही क्षेत्रे ;

(फ) ''पिकांना भांडवल पुरविणे'' म्हणजे नांगरणीच्या हंगामात पिकांच्या लागवडीसाठी किंवा त्यानंतर, नांगरणी, पेरणी, वखरणी, निंदणी, कापणी यांसाठी बियाणे, खत किंवा बैल यांच्या खरेदीसाठी किंवा अशा इतर प्रयोजनांसाठी आणि विहित करण्यात येईल अशा (कर्ज ज्या तारखेला देण्यात आले असेल त्या तारखेपासून पाच वर्षापेक्षा अधिक होणार नाही अशा) कालावधीमध्ये द्यावयाची असतील अशी कर्ज देणे ;

(ग) ''विहित'' म्हणजे या प्रकरणाखाली करण्यात आलेल्या नियमाद्वारे विहित करण्चात आलेला ;

१९६१ चा महा. २४. (ह) ''साधनसंस्था'' या संज्ञेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यांमध्ये जो अर्थ देण्यात आला असेल तोच अर्थ असेल ;

(आय) ''हंगामी वित्तव्यवस्था'' म्हणजे जलसिंचनासाठी जमीन तयार करण्यासाठी जमिनीची धूप होऊ नये म्हणून शेतात पाट किंवा बांध बांधण्यासाठी, गाळ, काढण्यासाठी किंवा अशा इतर प्रयोजनांसाठी आणि विहित करण्यात येईल कालावधीमध्ये द्यावयाची असतील अशी कर्जे देणे ;

१९०८ चा ५. (ज) या प्रकरणांमध्ये वापरण्यात आलेले पण या प्रकरणांमध्ये व्याख्या न देण्यात आलेले शब्द व संज्ञा यांना या अधिनियमांच्या इतर प्रकरणामध्ये किंवा यथास्थिति, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ यांमध्ये जो अर्थ देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

२४. (१) कोणत्याही ऋणकोला किंवा त्याच्या धनकोला या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये, ऋणकोच्या ऋणांच्या समायोजनासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(२) या कलमाखालील प्रत्येक अर्ज, विहित नमुन्यामध्ये लेखी करण्यात येईल आणि त्यावर विहित रीतीने, सही करण्यात येईल, विहित रीतीने त्याची पडताळणी करण्यात येईल व तो सादर करण्यात येईल आणि त्यामध्ये विहित करण्यात येईल अशा तपशीलराचा अंतर्भाव असेल आणि विहित करण्यात येतील अशा दस्तऐवजांच्या प्रती त्याच्यासोबत असतील.

(३) कलमे ५८ व ६० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखालील अर्जामध्ये त्या कलमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या, ऋणकोंकडून देय असलेल्या, सर्व ऋणांच्या तपशीलाचाही अंतर्भाव असेल.

(४) या कलमाखाली करण्यात आलेला, अर्ज न्यायालयाच्या परवानगीशिवाय मागे घेण्यात येणार नाही.

(५) या कलमाखाली एकाच ऋणकोकडून किंवा त्याच्याविरुद्ध दोन किंवा अधिक अर्ज करण्यात आलेले असतील अशा बाबतीत, असे सर्व अर्ज एकत्रित करण्यात येतील. असे अर्ज, संयुक्त ऋणकोंकडून किंवा त्यांच्या विरुद्ध दाखल करण्यात आले असतील अशा बाबतीत, अशा सर्व अर्जांची सुनावणी एकत्र करण्यात येईल.

प्रत्येक धनकोने व ऋणकोने न्यायालयासमोर खरे व अचूक विवरणपत्र विवरणपत्र दाखल करणे.

२५. (१) कलम २४ खाली कोणताही अर्ज करण्यात आलेला नव्हता, ही वस्तुस्थिती, असली तरीही—

(अ) प्रत्येक धनको, त्याच्या कोणत्याही ऋणकोने लेखी नोटिशीद्वारे, त्याला तसे करण्यास फर्मावल्यावर अशी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांमध्ये कोणत्याही, हुकूमनाम्याखाली किंवा अन्य प्रकारे, अशा ऋणकोविरुद्ध असलेल्या त्याच्या सर्व हक्क मागण्यांचे खरे आणि अचूक विवरणपत्र न्यायालयासमोर दाखल करील, आणि त्याचवेळी अशा ऋणकोला एक प्रत पाठवील, आणि

(ब) प्रत्येक ऋणको, अशा कोणत्याही हुकमानाम्याअन्वये लेखी नोटिशीद्वारे, त्याला तसे करण्यास फर्मावल्यावर अशी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांमध्ये न्यायालयासमोर —

(एक) असा ऋणको, अशा कोणत्याही हुकमनाम्याअन्वये किंवा अन्यथा अशा धनकोला किंवा धनकोंना देणे लागत असेल अशी सर्व ऋणांचे;

(दोन) कृषिविषयक प्रयोजनांसाठी करण्यात येणारी कोणतीही जमीन तो धारण करतो किंवा कसे अणि तसे असल्यास, अशा प्रकारे, धारण करण्यात आलेल्या जमिनीचे निश्चित क्षेत्र आणि स्थान, अशी जमीन महानगरपालिका, क्षेत्रात असेल तर, महानगरपालिकेने त्याबाबतीत प्राधिकृत केलेले असेल अशा महानगरपालिकेच्या अभियंत्याने आणि इतरत्र अशी जमीन ज्या क्षेत्रामध्ये असेल अशा क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या तहसीलदाराने, प्रमाणित केले असेल असे तिचे बाजार मूल्य अणि संबद्ध कुळवहिवाट कायद्याच्या अर्थानुसार त्या जमिनीची तो स्वतः लागवड करतो किंवा कसे, हे घोषित करणारे;

(तीन) नोटीशीच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या वर्षातील, त्याच्या शेतीपासून आणि शेतीखेरीज इतर मार्गांनी मिळणाऱ्या एकूण उत्पन्नांचे, शेतीचे आणि बिगरशेतकी उत्पन्न आणि स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेले बिगरशेतकी उत्पन्नाचे निरनिराळे मार्ग यांचे;

(चार) त्याची इतर स्थावर मालमत्ता, कोणतीही असल्यास, ती मालमत्ता महानगरपालिका क्षेत्रात असेल तर महानगरपालिकेने त्याबाबतीत प्राधिकृत केले असेल अशा महानगरपालिकेच्या अभियंत्याने आणि इतरत्र अशी मालमत्ता ज्या क्षेत्रामध्ये असेल अशा क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या तहसीलदारने, प्रमाणित केले असेल अशा बाजार मूल्यासह अशा मालमत्तेचे;

खरे व अचूक विवरणपत्र दाखल करील,

ऋणको त्याचवेळी अशा विवरणपत्राची एक प्रत अशा धनकालाही पाठवील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयाला पुरेशा कारणासाठी धनकोला, किंवा यथास्थिती, ऋणकोला या कलमान्वये ज्या कालावधीमध्ये विवरणपत्र दाखल, करता येईल असा कालावधी, वेळोवेळी, वाढविता येईल (मात्र असा एकूण कालावधी सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.)

(३) पोट-कलम (१) अन्वये नोटीस देणारा प्रत्येक धनको किंवा ऋणको त्याचवेळी त्या नोटिशीची एक प्रत न्यायालयाकडे पाठवील.

(४) कलम २४ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जाच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीच्या खर्चाचा निवाडा देतांना, पोट-कलम (१) अन्वये दाखल करण्यास फर्माविण्यात आलेले विवरणपत्र पुरेसे कारण नसतांना, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वेळेत, किंवा पोट-कलम, (२) अन्वये वाढविण्यात आलेल्या कालावधीत दाखल केले नाही किंवा चुकीचे दाखल केले आहे याबाबत न्यायालयाचे समाधान झाले तर, त्याला कसूर करणाऱ्या पक्षकाराला, असा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग सोसण्याबाबत निदेश देता येतील.

ऋणको नसलेल्या व्यक्तीच्या अभिहस्तांकितीला या प्रकरणा-खालील लाभ घेण्याचा हक्क नसणे.

२६. स्वतः ऋणको नाही अशा कोणत्याही व्यक्तीने या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेनंतर ज्याच्याकडे असे ऋण हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित केले आहे अशा एखाद्या ऋणकोकडून येणे असलेल्या कोणत्याही ऋणाच्या समायोजनासाठी कलम २४ अन्वये कोणताही अर्ज करता येणार नाही.

समझोता अभिलिखित करण्यासाठी अर्ज

२७. (१) कोणत्याही ऋणकोकडून धनकोला किंवा धनकोंना येणे असलेल्या कोणत्याही ऋणाच्या संबंधात, कोणताही ऋणको आणि त्याचे सर्व किंवा कोणतेही धनको यांच्यात, समझोता, झाला तर त्या ऋणकोला किंवा कोणत्याही धनकोला, अशा समझोत्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, असा समझोता अभिलिखित करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(२) असा प्रत्येक अर्ज विहित नमुन्यात असेल आणि त्यावर विहित रितीने सही करण्यात येईल आणि त्याची विहित रीतीने पडताळणी करण्यात येईल अणि तो सादर करण्यात येईल.

(३) असा अर्ज मिळाल्यानंतर, न्यायालय, धनकोला किंवा धनकोंना, किंवा यथास्थिती, ऋणकोला, विहित नमुन्यात नोटीस दिल्यानंतर, आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, झालेला समझोता, हा सद्भावपर्वक आणि स्वेच्छापूर्वक करण्यात आलेला आहे आणि ऋणकोंच्या कोणत्याही धनकोंना बुडविण्याच्या किंवा त्यांना विलंब करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेला नाही आणि तो ऋणकोच्या हिताचा आहे याबद्दल न्यायालयाची खात्री झाली तर, ते असा समझोता अभिलिखित करील आणि तो प्रामाणित करील. अशा प्रकारे, अभिलिखित आणि प्रभणित केलेला प्रत्येक समझोता त्यामधील पक्षकारांवर बंधनकारक असेल आणि यात यापुढे उपबंधित करण्यात आलेले असेल ते खेरीज करुन, तो वाद पुन्हा सुरु करता येणार नाही.

(४) पोट-कलम (३) अन्वये समझोता अभिलिखित आणि प्रमाणित करण्यात आल्यानंतर न्यायालये, ऋणकोला, समझोत्यामध्ये ज्याच समावेश करण्यात आला नाही अशी त्याचाकडून येणे असलेली इतर कोणतीही ऋणे आहेत किंवा कसे, तो घोषित करण्याचा आदेश देईल. अशी कोणतीही ऋण नसल्याचे ऋणकोने घोषित केले तर, न्यायालय, चौकशी करील आणि समझोत्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या ऋणंखेरीज इतर कोणतीही ऋणे नसल्याबद्दल खात्री करुन घेईल आणि त्यानंतर, अशा समझोत्यामधील अटींनुसार निवाडा देईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये चौकशी केल्यानंतर, समझोत्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाहीत अशी इतर ऋणेही ऋणकोकडून येणे आहेत याबद्दल न्यायालयाची खात्री झाली तर, न्यायालयाकडून, पोट-कलम, (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज हा कलम २४ खालील ऋणांच्या समायोजनासाठी केलेला अर्ज असल्याचे समजण्यात येईल.

ऋणांचे विवरणपत्र सादर करण्यासाठी ऋणकोवर व धनकोवर नोटीस बजावणे.

२८. कलम २४ अन्वये करण्यात आलेला अर्ज मिळाल्यावर न्यायालय,—

(अ) अर्जात ज्याचे नाव आणि पत्ता देण्यात आलेला आहे अशा ऋणकोला (ऋणको स्वतः अर्जदार नसेल तर) आणि प्रत्येक धनकोला (जो स्वतः अर्जदार आहे अशा धनकोखेरीज इतर) नोटीस देईल, आणि

(ब) नोटीस बजावल्याची तारीख आणि सर्वसाधारण नोटीस प्रसिद्ध केल्याची तारीख यांपैकी जी नंतरची असेल अशा तारखेपासून एक महिन्याच्या आत, विहित नमुन्यात ऋणांचे विवरणपत्र सादर करण्यास, ऋणको व सर्व धनको यांना फर्माविणारी, सर्वसाधारण नोटीस प्रसिद्ध करील :

परंतु ऋणकोला किंवा कोणत्याही धनकोला, चांगल्या आणि पुरेशा कारणासाठी नोटीसीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीमध्ये, तिचे अनुपालन करणे शक्य नव्हते याबाबत न्यायालयाची खात्री होईल, तर त्यास विवरणपत्र सादर करण्याचा कालावधी वाढविता येईल.

ज्यांच्या संबंधात समायोजनासाठी किंवा समझोत्यासाठी अर्ज करण्यात आलेला नाही अशी ऋणे नष्ट करणे.

२९. ज्याच्यासंबंधात कलम २४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपूर्वी त्या कलमान्वये अर्ज करण्यात आलेला नाही किंवा ज्याच्या संबंधात कलम २७ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीमध्ये त्या कलमाखाली समझोता अभिलिखित करण्यासाठी अर्ज आलेला नाही किंवा ज्याच्या संबंधात न्यायालयाकडे करण्यात आलेला अर्ज कलम २४ च्या पोट-कलम (३) अन्वये मागे घेण्यात आलेला आह आणि त्या कलमान्वये नवीन अर्ज करण्यात आलेला नाही, असे ऋणकोकडून येणे असलेले प्रत्येक ऋण आणि ज्याच्यासंबंधात धनकोने कलम २८ च्या तरतूदीनुसार विवरणपत्र सादर केलेले नाही असे, अशा ऋणकोकडून येणे असलेले प्रत्येक ऋण नष्ट होईल.

ऋणको आणि धनको यांची कर्तव्ये.

३०. (१) कलम २४ अन्वये ज्याच्याकडून किंवा ज्याच्याविरुद्ध अर्ज करण्यात आला असेल असा किंवा कलम २७ अन्वये करण्यात आलेल्या अर्जात जो एक पक्षकार आहे असा प्रत्येक ऋणको, सर्वलेखा पुस्तके सादर करील आणि न्यायालयाकडून फर्मावण्यात येईल किंवा विहित करण्यात येईल अशा त्याच्या मालमत्तेची वस्तुसूची आणि त्याचे धनको आणि ऋणको आणि त्याची आणि त्याला येणे असलेली ऋणे यांच्या सूच्या देईल. त्याची मालमत्ता किंव त्यांच्या धनकोची मालमत्ता यांच्या संबंधातील तपासणी करू देण्यासाठी, न्यायालय ठरवील अशा वेळी, न्यायालयासमोर हजर होईल व सर्वसाधारणपणे न्यायालयाकडून फर्मावण्यात येईल किंवा विहित करण्यात येतील अशा सर्व गोष्टी करील.

(२) न्यायालयाकडून फर्माविण्यात येईल किंवा विहित करण्यात येईल अशा लेख्यांची पुस्तके तपासणीसाठी सादर करणे, ऋणकोकडून त्याला देणे असलेल्या ऋणांच्या आणि त्याने धारण केलेल्या प्रतिभूतीच्या संबंधात न्यायालयाकडून फर्मावण्यात येईल किंवा विहित करण्यात येईल अशी माहिती पुरवणे हे प्रत्येक धनकोचे कर्तव्य असेल.

प्रारंभिक वाद प्रश्न

**३१.** (१) कलम २४ अन्वये करण्यात आलेला अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेला, न्यायालय पुढील मुद्याचा प्रारंभिक वादप्रश्न म्हणून निर्णय करील :—

(अ) जिच्या ऋणांच्या समायोजनासाठी अर्ज करण्यात आला आहे अशी व्यक्ती, कलम २३ च्या खंड (ड) च्या अर्थांतर्गत ऋणको आहे किंवा कसे,

(ब) धनको, अशा ऋणको विरुद्ध विधिग्राह्य हुकूमनामा धारण करतो/करतात किंवा कसे,

(क) विधि ग्राह्य दस्तऐवजांच्या आणि त्याने किंवा त्यांनी कामकाजाच्या रितसर ठेवलेल्या हिशेबाच्या आधारावर, धनकोची किंवा धनकोंची त्या ऋणकोकडे इतर कोणती ऋणे आहेत किंवा कसे.

(२) अशी व्यक्ती ऋणको नाही किंवा धनकोने किंवा धनकोंनी विधिग्राह्य हुकूमनामा धारण केलेला नाही किंवा त्या ऋणकोविरुद्ध इतर कोणतीही ऋणे देय नाहीत असें न्यायालयाला आढळून आले तर, न्यायालय तो अर्ज तात्काळ फेटाळून लावील.

(३) कलम २४ अन्वये अर्ज करणारी व्यक्ती किंवा त्या कलमान्वये जिच्याविरुद्ध अर्ज करण्यात आला असेल ती व्यक्ती ऋणको आहे, असे न्यायालयाला आढळून आले तर न्यायालय हिशेब घेण्याची आणि ऋण कमी करण्याची यात यापुढे तरतूद करण्यात आलेल्या रीतीने कार्यवाही करील.

धनकोची आणि ऋणकोची तपासणी

**३२.** ऋणांच्या समायोजनासाठीच्या अर्जात, धनकोची हक्क मागणीची रक्कम विवादास्पद असेल तर, न्यायालय, हिशेब करताना, लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी न्यायालयास तसे करणे अनावश्यक वाटेल त्याशिवाय धनको आणि ऋणको या दोघांचीही साक्षीदार म्हणून तपासणी करील.

हिशेब घेण्याची पद्धती.

**३३.** चक्रवाढ व्याज देण्याविषयी किंवा गहाण मालमत्तेच्या नफ्याचा हिशेब न ठेवता तो व्याजादाखल वजा करण्याविषयी किंवा अन्यथा हिशेब ठेवण्याची रीत निर्धारित करण्याविषयी असा, पक्षकार किंवा व्यक्ती यांच्यामध्ये, कोणत्याही असल्यास, कोणताही करार झालेला असला, आणि पूर्वीचे व्यवहार समाप्त करून नवीन बोझा निर्माण करण्याचा आशय असलेले कोणतेही निवेदन किंवा हिशेबाचा मेळ किंवा कोणताही करार असला तरीही, न्यायालय त्या प्रकरणाच्या पूर्वेतिहासाची व गुणावगुणांची चौकशी करील आणि ज्या व्यवहाराच्या आधारे ते हक्कमागणी करीत असतील व ज्यामधून हक्कमागणी उद्‌भवली असेल अशा पक्षकार व व्यक्ती यांच्यामधील, कोणत्याही असल्यास, व्यवहाराचा प्रारंभापासूनचा हिशेब घेईल, आणि कलम २४ अन्वये करण्यात आलेल्या अर्जाच्या तारखेस पुढील नियमानुसार प्रत्येक धनकोस देय असलेली रक्कम निर्धारित करील :—

(अ) मुद्दल आणि व्याज याचा स्वतंत्र हिशेब घेण्यात येईल.

(ब) मुद्दलाच्या हिशोबात, धनकोकडून वेळोवेळी प्रत्यक्ष ऋणकोला किंवा त्यासाठी मिळालेल्या अशा रकमा आणि धनकोने त्याला विकलेल्या मालाची, कोणताही असल्यास, रक्कम ऋणकोच्या नावे नमूद करण्यात येईलः

(क) मुद्दल आणि व्याज यांच्या हिशोबातून कोणत्याही ऋणाच्या बाबतीत, सक्षम न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये अनुक्रमे (मुद्दल खर्चासह) आणि व्याज यासाठी देय असलेल्या रकमा, कोणत्याही असल्यास, नावे खर्ची घालण्यात येतील.

परंतु, अशा हुकूमनाम्यात किंवा आदेशात मुद्दलाची व व्याजाची रक्कम स्वतंत्रपणे विनिर्दिष्ट केलेली नसेल किंवा ती निर्धारित करण्यासाठी कोणत्याही महत्वपूर्ण गोष्टी अंतर्भूत नसतील तर, या खंडाच्या प्रयोजनासाठी अशा हुकूमनाम्याद्वारे किंवा आदेशाद्वारे दिलेल्या रक्कमेच्या दोन तृतीयांश आणि एक तृतीयांश एवढी रक्कम, अनुक्रमे मुद्दलासाठी (खर्चासह) आणि व्याजासाठी देऊ करण्यात आल असल्याचे मानण्यात येईल.

(ड) व्याजाच्या हिशोबात, पक्षकारांमध्ये संमत झालेल्या दराने किंवा पक्षकारांमध्ये दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये करण्यात आलेल्या दराने किंवा दरसाल दरशेकडा सहा टक्क्यांहून जास्त नाही अशा दराने, यातील जो सर्वांत कमी असेल, त्या दराने त्या त्या वेळी देय असलेल्या मुद्दलाच्या शिल्लक रकमेवरील सरळ व्याज ऋणकोच्या नावे खर्ची घालण्यात येईल.

(ई) ऋणकोकडून भरण्यात आलेल्या सर्व रकमांची नोंद प्रथम देय व्याजाच्या जमा खाती करण्यात येईल आणि शिल्लक, काही असल्यास, मुद्दलाच्या परतफेडीदाखल जमा करण्यात येईल. अशा रीतीने संगणना केलेले मुद्दल आणि देय व्याज यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे क्रमाने ते कमी करण्याच्या प्रयोजनासाठी, अर्जाच्या तारखेस, निव्वळ शिल्लक ऋण असल्याचे समजण्यात येईल. कोणत्याही प्रकरणी, केलेली एकूण परतफेड ही मुद्दलाच्या दुपटीहून जास्त असणार नाही.

**विवक्षित प्रकरणी नफ्यांऐवजी भाडे/खंड आकारता येईल.**

३४. कोणतीही गहाण ठेवलेली मालमत्ता ही, गहाणदाराच्या किंवा गहाणकाराव्यतिरिक्त त्याच्या इतर भाडेकरूच्या कब्जात असेल आणि प्रत्यक्ष नफा किती झाला हे ठरविण्यास न्यायालय असमर्थ असेल त्याबाबतात, त्यास अशा मालमत्तेसाठी रास्त भाडे/खंड निश्चित करता येईल आणि कलम ३३ च्या प्रयोजनासाठी, नफा म्हणून असे भाडे/खंड गहाणदारावर आकारता येईल :

परंतु, कोणत्याही वर्षात, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या जमीन महसुलाशी संबंधित अशा कोणत्याही कायद्यान्वये अशा जमिनीचा जमीन महसूल किंवा खंड निलंबित केला असल्याचे किंवा त्यात सूट दिली असल्याचे सिध्द करण्यात आल्यास, अशा रकमेच्या सर्व किंवा काही भागास, त्या वर्षासाठी सूट देता येईल.

**विवक्षित हस्तांतरणे ही गहाणाच्या स्वरुपात असल्याचे जाहीर करण्याचा न्यायालयाचा अधिकार.**

३५. कोणत्याही कायद्यात, रूढीत किंवा संविदेत एतद्विरुध्द काहीही असेल तरी, कलम २४ अन्वये केलेल्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी, जिच्या ऋणाचे या प्रकरणान्वये समायोजन करण्यात येत असेल अशा व्यक्तीद्वारे किंवा जिच्यामार्फत त्यास ते ऋण वारसा म्हणून मिळाले असेल, अशा व्यक्तीद्वारे, करण्यात आलेले जमिनीचे कोणतेही हस्तांतरण हे, गहाणाच्या स्वरुपातील हस्तांतरण असल्याचे अभिकथित करण्यात येईल तेव्हा त्या हस्तांतरणाशी संबंधित असलेल्या परिस्थितीवरून ते हस्तांतरण हे गहाणाच्या स्वरुपात असल्याचे दिसून येते, अशी न्यायालयाची खात्री झाली तर, न्यायालय ते हस्तांतरण गहाण म्हणून जाहीर करील.

**कलम ३५ च्या तरतुदी विवक्षित हस्तांतरणांना व हस्तांतरितींना लागू नसणे.**

३६. कलम ३५ मधील कोणतीही गोष्ट—

(अ) न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या इतर प्राधिकरणाच्या हुकूमनाम्याद्वारे, जे कोणतेही हस्तांतरण गहाण खेरीज हस्तांतरण म्हणून अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यात आले असेल अशा कोणत्याही हस्तांतरणास ; आणि

(ब) या प्रकरणाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी, केलेल्या नोंदणीकृत विलेखान्वये हस्तांतरिती किंवा प्रतिनिधी मालमत्ता धारण करीत असेल त्याबाबतीत अशा हस्तांतरणाच्या खऱ्या स्वरुपाची दखल घेतल्याशिवाय जो वास्तविक मूल्यार्थ हस्तांतरिती असेल त्यास किंवा त्याच्या प्रतिनिधीस, लागू होणार नाही.

**मालमत्तेचा तपशील, मूल्य, इत्यादी ठरवणे, हे न्यायालयाचे कर्तव्य असणे.**

३७. कलम ३३ खाली हिशेब घेतल्यानंतर, न्यायालयात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने पुढील गोष्टी ठरवील :–

(अ) ऋणकोच्या मालकीच्या मालमत्तेचा तपशील,

(ब) उक्त मालमत्तेचे मूल्य,

(क) उक्त मालमत्तेवरील कोणत्याही भारांचा तपशील,

(ड) सीमांतिक शेतकरी, लहान शेतकरी किंवा इतर शेतकरी असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत, विहित केलेल्या रीतीनुसार, अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षातील शेतीच्या उत्पन्नाचे सरासरी वार्षिक स्थूल मूल्य,

(ई) कामगार, ग्रामीण कारागीर किंवा ग्रामीण मजूर असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत, विहित केलेल्या रीतीनुसार अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षातील सरासरी वार्षिक स्थूल उत्पन्न,

(फ) ऋणकोची पैसे भरण्याची क्षमता.

लबाडीने केलेली अन्य संक्रामणे किंवा भार निरर्थक असणे.

**३८.** (१) कलम २४ अन्वये केलेल्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी, ऋणकोने त्याच्या कोणत्याही धनकोस बुडवण्याच्या किंवा त्यांना विलंब करण्याच्या उद्देशाने मालमत्तेचे अन्यसंक्रामण केले आहे किंवा त्यावर कोणताही भार निर्माण केला आहे असे न्यायालयास आढळून आले तर, न्यायालय, नोटिशीद्वारे, ऋणकोला आणि जिच्या वतीने त्याने अन्यसंक्रामण केले किंवा भार निर्माण केला त्या व्यक्तीस, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी, न्यायालयापुढे हजर राहण्यासाठी बोलावील.

(२) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिवशी किंवा त्या दिवसापर्यंत सुनावणी स्थगित करण्यात आली असेल अशा दिवशी न्यायालय, पक्षकारांचे म्हणणे ऐकूण घेईल आणि सादर करण्यात येईल अशा पुराव्याची नोंद करील. ऋणकोच्या कोणत्याही धनकोस बुडवण्याच्या किंवा त्यांना विलंब करण्याच्या उद्देशाने अन्यसंक्रमण केले गेले होते किंवा भार निर्माण करण्यात आला होता अशी न्यायालयाची खात्री झाली तर, न्यायालय, अन्यसंक्रामण किंवा भार हा निरर्थक झाल्याचे जाहीर करील.

(३) सद्भावनेने व मूल्यवान मोबदल्यादाखल अन्य संक्रामण किंवा भार निर्माण करण्यात आला असेल तर अशा अन्य संक्रामितीच्या किंवा भारधारकाच्या हक्कास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे हानी पोहचणार नाही.

ऋणकोची पैसे भरण्याची क्षमता.

**३९.** या प्रकरणांच्या प्रयोजनासाठी ऋणकोची पैसे भरण्याची क्षमता ही, सीमांतिक किंवा लहान किंवा इतर शेतकऱ्यांच्या बाबतीत, अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षातील त्याच्या शेतीच्या उत्पन्नाच्या सरासरी वार्षिक स्थूल मूल्याच्या २० टक्के आणि कामगार, ग्रामीण कारागीर किंवा ग्रामीण मजूर यांच्याबाबतीत, अशा कालावधीतील त्याच्या सरासरी स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या २० टक्के इतकी मानण्यात येईल.

ऋणकोकडून देय असलेली ऋणे कमी करणे.

**४०.** कोणत्याही कायद्यात, रूढीत, संविदेत, निवाड्यात किंवा न्यायालयाच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात एतद्विरूध्द काहीही असले तरी, ऋणकोकडून कलम ३३ अन्वये देय असल्याचे आढळलेल्या रकमा यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने ;—

(एक) सीमांतिक किंवा लहान शेतकरी, किंवा इतर शेतकरी किंवा ग्रामीण कारागीर किंवा ग्रामीण मजूर असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत, हिशेब घेतल्यानंतर देय असल्याचे आढळून आलेली ऋणांची एकूण रक्कम, मग त्याबाबतीत प्रतिभूती घेतलेली असो किंवा नसो, अशा ऋणांच्या १० टक्के इतकी कमी करण्यात येईल.

(दोन) कामगार असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत, हिशेब घेतल्यानंतर, देय असल्याचे आढळून आलेली ऋणांची एकूण रक्कम, मग त्याबाबतीत प्रतिभूती घेतलेली असो किंवा नसो, अशा ऋणांच्या ५० टक्के इतकी कमी करण्यात येईल.

(तीन) खंड (एक) आणि (दोन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कमी करावयाचे ऋण हे कलम ३९ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने गणना केलेल्या त्याच्या, परतफेडीच्या क्षमतेच्या आधारे सात वर्षाच्या कालावधीत ऋणकोस परतफेड करणे शक्य असेल, अशा रकमेहून जास्त असणार नाही.

**४१.** (१) कलम ४० च्या तरतुदीनुसार धनकोस देय असलेल्या ऋणांच्या रकमा ठरविल्यानंतर न्यायालय निवाडा देईल. निवाडा.

(२) अशा रीतीने कमी केलेल्या रकमेच्या आधारे न्यायालयाने निवाडा दिल्यानंतर, निवाडयात विनिर्दिष्ट केलेली कमी केलेली रक्कम ही, ऋणकोकडून त्याच्या ऋणाच्या बाबतीत देय असलेली रक्कम असेल आणि अशा रकमेव्यतिरिक्त शिल्लक असलेली देय रक्कम ही, नष्ट होईल.

(३) निवाडा हा विहित नमुन्यात असेल आणि तो पुढील तरतुदीच्या अधीन राहून काढण्यात येईल :–

(अ) कमी केलेली, प्रतिभूत ऋणाची रक्कम, ही ज्या मालमत्तेच्या आधारे ती प्रतिभूत करण्यात आली असेल अशा मालमत्तेवर आकारण्यात येईल ;

(ब) ज्या प्राथम्यक्रमानुसार ऋण फेडण्यात येतील तो प्राथम्यक्रम ठरविताना, पुढील क्रम अनुसरण्यात येईल :–

(एक) ऋणकोच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेवर आकारण्यात येणारी किंवा चालू वर्षाचा जमीन महसूल म्हणून वसुलीयोग्य असलेली, शासनास देय असलेली ऋणे ;

(दोन) ऋणकोच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेवर आकारण्यात येणारी किंवा चालू वर्षाच्या देय रकमा म्हणून वसुलीयोग्य असलेली, स्थानिक प्राधिकरणास देय असलेली ऋणे ;

(तीन) साधन संस्थांनी दिलेली कर्जे, साधन संस्था नाहीत अशा सहकारी संस्थांना देय असलेली प्रतिभूत ऋणे, आणि कलम ६०, खंड (क) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही परिसंस्थांना देय असलेली ऋणे ;

(चार) प्राथम्यक्रमानुसार प्रतिभूत ऋणे ;

(पाच) अप्रतिभूत ऋणे ;

परंतु, अप्रतिभूत ऋणांच्या बाबतीत, ती यथाप्रमाण फेडण्यात येतील :

(क) सीमांतिक किंवा लहान किंवा इतर शेतकरी असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत, ज्या वार्षिक हप्त्यांत ऋणे फेडावयाची ते एकूण वार्षिक हप्ते, सातपेक्षा जास्त असणार नाहीत आणि कामगार ग्रामीण कारागीर किंवा ग्रामीण मजूर असणाऱ्या ऋणकोच्या बाबतीत, एकूण मासिक हप्ते हे चौऱ्यांऐंशी पेक्षा जास्त असणार नाहीत :

परंतु, ज्या हप्त्यात ऋणे फेडावयाची त्या हप्त्याची रक्कम ठरविताना न्यायालय, ऋणकोचे निव्वळ वार्षिक उत्पन्न निश्चित करील आणि ऋणकोने देय असलेले कोणत्याही वर्षातील वार्षिक हप्ते किंवा बारा मासिक हप्ते हे, त्याच्या निव्वळ वार्षिक उत्पन्नाहून जास्त असणार नाहीत ;

**स्पष्टीकरण.**–या खंडाच्या प्रयोजनाकरिता ऋणकोचे निव्वळ वार्षिक उत्पन्न म्हणजे पुढील रकमा वजा केल्यानंतर त्याच्या वार्षिक उत्पन्नाची राहिलेली शिल्लक —

(एक) सक्षम न्यायालयाने संमत केलेल्या हुकूमनाम्यांन्वये किंवा काढलेल्या आदेशान्वये निर्वाहासाठी ऋणकोवर लादलेल्या दायित्वाच्या रकमा, कोणत्याही असल्यास, त्या भरण्यासाठी आवश्यक असेल अशी रक्कम,

(दोन) ऋणकोच्या आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या निर्वाहासाठी म्हणजेच त्याची/तिचा पत्नी/पती आणि त्याची विवाहित किंवा अविवाहित मुले, त्याचे आई-वडील, बहिणी, सुना, अशा व्यक्ती (पत्नी/पती व्यतिरिक्त) त्याच्यावर अवलंबून असतील तर, त्यांच्या निर्वाहासाठी आवश्यक असेल अशी रक्कम, आणि

(तीन) चालू वर्षाची आकारणीची आणि कराची रक्कम शासनाकडे आणि स्थानिक प्राधिकरणाकडे भरण्यासाठी आणि पिकांसाठी भांडवल पुरवण्याच्या किंवा हंगामी अर्थसहाय्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही कायद्याअन्वये घेतलेली कर्जे फेडण्यासाठी ऋणकोस आवश्यक असलेली रक्कम,

(ड) एतद्विरुध्द कोणताही कायदा किंवा करार असला तरी, न्यायालयास, कोणत्याही मालमत्तेचा कब्जा स्वाधीन करण्याबद्दल आदेश देता येईल ;

(ई) व्याजाचा दर हा, दरसाल दर शेकडा सहा किंवा राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल असा कमी दर किंवा मुळात ऋण काढण्यात आले तेव्हा पक्षकारात मान्य करण्यात आलेला दर किंवा अशा ऋणाच्या संबंधात हुकूमनाम्याद्वारे मंजूर केलेला दर, यापैकी जो सर्वात कमी असेल, त्या दरापेक्षा अधिक असणार नाही.

कोणताही पक्षकार उपस्थित न राहिल्यास एकतर्फी कार्यवाही करणे.

**४२.** (१) कलम २४ अन्वये जिच्या ऋणांच्या समायोजनासाठी अर्ज करण्यात आला आहे अशी व्यक्ती किंवा तिच्या धनकोपैकी कोणीही अर्जाच्या सुनावणीसाठी ठरवलेल्या तारखेस किंवा ज्या तारखेपर्यंत सुनावणी स्थगित करण्यात येईल त्या कोणत्याही तारखेस, उपस्थित राहिला नाही तर न्यायालय, अर्जाची एकतर्फी सुनावणीची कार्यवाही करील. प्रारंभिक वादप्रश्नाबाबत निर्णय करील आणि उपलब्ध पुराव्याच्या आधारे, आवश्यक वाटल्यास, निवाडा देईल.

(२) जेव्हा कलम २४ अन्वये केलेल्या अर्जाची सुनावणी करण्यात येईल व पोट-कलम (१) खाली त्याचा एकतर्फी निर्णय करण्यात येईल, तेव्हा प्रारंभिक वादप्रश्नावरील निर्णय किंवा निवाडा पुरेशा कारणाशिवाय यातील पक्षकारापैकी कोणताही पक्षकार सुनावणीच्या वेळी उपस्थित नव्हता, केवळ याच कारणावरुन पुन्हा सुरू करता येणार नाही.

निवाड्याची नोंदणी करणे इ.

**४३.** (१) या प्रकरणाखाली दिलेला प्रत्येक निवाडा, जर तो ऋणकोच्या मालमत्तेवर आकारलेल्या ऋणांच्या संबंधातील असेल तर, कलम ५१ अन्वये देय असलेली न्यायालय फी भरल्यानंतर, यात यानंतर तरतूद करण्यात आलेल्या रीतीने नोंदण्यात येईल.

(२) निवाड्यावरील न्यायालय फी ही, न्यायालयाकडून ज्या पक्षकाराला खर्च सोसण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या पक्षकाराकडून देण्यात येईल :

परंतु, ज्याला खर्च सोसण्याचा आदेश देण्यात आलेला नसेल अशा कोणत्याही धनकोस, न्यायालय फी देता येईल. अशा धनकोस, त्याने दिलेला न्यायालय फीचा रक्कम ऋणकोकडून निवाड्यानुसार त्याला देय असलेल्या पहिल्या हप्त्याबरोबर, वसूल करण्याचा हक्क राहील.

(३) सर्व नोंदणी कार्यालयांमध्ये, "ऋण समायोजन निवाड्यांची नोंदवही" या नावाचे एक पुस्तक आणि त्याच्याशी संबंधित निर्देश सूची ठेवण्यात येईल. हे पुस्तक व निर्देशसूची, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवण्यात येईल व असा तपशील त्यात असेल.

(४) या कलमान्वये निवाड्याची नोंदणी करणे आवश्यक असेल त्या बाबतीत, कलम ५१ च्या तरतुदीनुसार निवाड्यावरील न्यायालय फी देण्यात आल्यानंतर निवाड्याची एक प्रमाणित प्रत, राज्य शासन विहित करील असा तपशील अंतर्भूत असणाऱ्या निवेदनासह, निवाड्याचा विषय असणारी मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग ज्या उप जिल्ह्यात असेल, त्या उप जिल्ह्याच्या उप-निबंधकाकडे किंवा जर त्या क्षेत्राकरिता कोणताही उप-निबंधक नसेल तर, ज्या जिल्ह्यात मालमत्ता किंवा तिचा भाग असेल त्या जिल्ह्याच्या निबंधकाकडे पाठवणे हे निवाडा देणाऱ्या न्यायालयाचे कर्तव्य असेल.

(५) जर पक्षकाराने कलम ४९ अन्वये निवाड्याविरुध्द अपील दाखल केले असेल आणि जर असा निवाडा या कलमान्वये नोंदण्यात आलेला असेल तर, ज्या न्यायालयात अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाचे, पोट-कलम (४) अन्वये निवाड्याची प्रमाणित प्रत उप-निबंधकाकडे किंवा यथास्थिति निबंधकाकडे पाठवण्यात आली असेल त्या उप-निबंधकाकडे किंवा निबंधकाकडे अपील दाखल केल्याबाबतची नोटीस पाठवणे, हे कर्तव्य असेल.

(६) निवाड्याविरुध्द अपील करण्यासाठी तरतूद केलेली मुदत संपल्यानंतर, जर कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नसेल, किंवा उक्त अपील निकालात काढण्यात आल्यानंतर जर अपील दाखल करण्यात आले असेल तर उप-निबंधक किंवा यथास्थिति, निबंधक हा, निवाड्याची नोंदणी, ऋण समायोजन निवाड्याच्या नोंदवहीमध्ये करील आणि पोट-कलम (३) अन्वये ठेवलेल्या निर्देशसूचीमध्ये देखील त्याचा तपशील समाविष्ट करील.

(७) ज्याच्या ऋणांच्या समायोजनासाठी निवाडा देण्यात व नोंदवण्यात आला आहे अशा ऋणकोची कोणतीही मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिचा कोणताही हिस्सा किंवा तीमधील हितसंबंध संपादन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, या कलमान्वये निवाडा नोंदवण्यात आल्याच्या तारखेपासून उक्त निवाड्याची नोटीस देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

१९०८ चा १६. (८) यात तरतूद केलेली असेल ते खेरीजकरून, नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारासह, निवाड्यांच्या नोंदणीस लागू होतील.

**४४.** (१) निवाड्याअन्वये कोणत्याही धनकोस देय असणारा कोणताही हप्ता देण्यात ऋणकोने कसूर केल्यास, अशा धनकोस, निवाड्यांच्या अंमलबजावणीसाठी विहित नमुन्यात न्यायालयाकडे अर्ज करता येईल. निवाड्याची अंमलबजावणी.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर, हप्ता भरण्यात ऋणकोने कसूर केली आहे, याबद्दल न्यायालयाचे समाधान झाले तर, न्यायालय, अंमलबजावणीसाठी, निवाडा जिल्हाधिकाऱ्याकडे हस्तांतरित करील आणि त्यानंतर जिल्हाधिकारी, ऋणकोकडून हप्त्याची रक्कम, जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करील.

(३) न्यायालयाने कलम ४१ पोट-कलम (३) च्या खंड (ड) अन्वये कोणत्याही मालमत्तेचा कब्जा देण्याबाबतचा आदेश काढला तर असा आदेश, अशा अर्जानंतर, न्यायालय, जणू तो आदेश म्हणजे त्याने काढलेला हुकूमनामा असल्याप्रमाणे अंमलात आणील.

१९६६ चा महा. ४१. **४५.** जेव्हा कोणत्याही कारणासाठी, राज्य शासनाला देय असलेला जमीन महसूल हा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अन्वये अंशतः किंवा पूर्णतः स्थगित किंवा माफ करण्यात येईल. तेव्हा जर ऋणको हा सीमांतिक किंवा लहान शेतकरी असेल किंवा इतर प्रकारचा शेतकरी असेल तर त्या वर्षासाठी देय असलेला संपूर्ण हप्ता आणि नंतरच्या प्रत्येक वर्षासाठी निवाड्या अन्वये देय असलेल्या हप्त्याची पूर्ण रक्कम देण्याचे त्याच्या बाबतीत, एक वर्षासाठी लांबणीवर टाकण्यात येईल. सूट, इत्यादी, बाबतीत हप्ता देण्याचे लांबणीवर टाकणे.

**४६.** कोणताही कायदा किंवा करार यात एतद्विरूध्द काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलमे ४७ व ५६ यांच्या तरतुदींच्या अधीन, जर या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीत किंवा या प्रकरणाखाली नोंदलेल्या निवाड्यात ऋणको हा पक्षकार असेल तर, न्यायालयाच्या पूर्वमंजूरीने असेल ते खेरीज करून ऋणकोच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेचे त्याने तो सर्व ऋणातून मुक्त होण्यापूर्वी केलेले कोणतेही अन्य संक्रामण विधिग्राह्य असणार नाही. ऋणमुक्ततेपूर्वी ऋणकोने केलेले कोणतेही अन्यसंक्रामण विधिग्राह्य नसणे.

**४७.** जर न्यायालयाचे किंवा निवाड्याविरुध्दच्या अपिलाची सुनावणी करणाऱ्या न्यायालयाचे, कोणत्याही वेळी ऋणकोच्या ऋणाचे किंवा त्याच्या भागाचे परिसमापन करताना त्याच्या मालमत्तेचा कोणताही भाग विकणे ऋणकोच्या हिताचे आहे याबाबतीत समाधान झाले तर, अशा न्यायालयास विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रयोजनासाठी मालमत्तेचा असा भाग विकण्याची परवानगी ऋणकोला देता येईल. जर ऋणकोने ती तशी विकण्यात कसूर केली तर, अशा न्यायालयास तिची विक्री करण्याचा आदेश न्यायालयाच्या अधिकाऱ्याला देता येईल या कलमान्वये विक्री करण्याचा आदेश देण्यात आलेली मालमत्ता, विहित रीतीने अशा अधिकाऱ्यांकडून विकण्यात येईल. ऋणकोच्या ऋणाचे परिसमापन करताना न्यायालयास त्याच्या मालमत्तेच्या विक्रीचा आदेश देता येईल.

ा
त
ति
ी

विधी व्यवसायींना उपस्थित राहण्यापासून वगळणे.

**४८.** कलमे ३५, ३८ व ४४ खालील कार्यवाहीत असेल ते खेरीज करून कोणत्याही विधि व्यवसायीस या प्रकरणान्वये न्यायालयापुढील किंवा अपील न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणत्याही पक्षकाराच्या वतीने उपस्थित राहण्याचा हक्क असणार नाही :

परंतु, न्यायालयास किंवा अपील न्यायालयास, न्यायाच्या दृष्टीने, लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी पक्षकारांना, त्यांच्या स्वतःच्या खर्चाने, विधि व्यवसायीमार्फत प्रतिनिधित्व करण्यास अनुज्ञा देता येईल :

परंतु, आणखी असे की, या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीतील कोणत्याही विधि व्यवसायीच्या उपस्थितीबद्दल खर्चाचा भाग म्हणून कोणतीही फी मान्य केली जाणार नाही :

तसेच, जर कायदेशीररीत्या निःसमर्थ असणाऱ्या किंवा व्यवस्था पाहण्यास किंवा काम करण्यास अक्षम किंवा असमर्थ असणाऱ्या व्यक्तीच्या मालमत्तेचा पालक, प्रशासक किंवा व्यवस्थापक म्हणून शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांची नेमणूक झाली किंवा सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केले किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली त्याला त्याप्रमाणे प्राधिकृत करण्यात आले तर, अशा अधिकाऱ्यास न्यायालयापुढील किंवा अपील न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीत याबाबतीत याने लेखी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत, उपस्थित होण्याचा हक्क राहील. अशा प्रतिनिधीस अशा कोणत्याही कार्यवाहीत कोणताही अर्ज सादर करता येईल आणि अन्यथा अधिकाऱ्याच्यावतीने काम करता येईल.

अपिले.

**४९.** इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी :—

(१) अपील हे—

(एक) कलम २७, पोट-कलम (३) किंवा (४) खाली काढलेल्या प्रत्येक आदेशावर;

(दोन) कलम ३१ खाली घेतलेल्या प्रत्येक निर्णयावर किंवा काढलेल्या प्रत्येक आदेशावर ;

(तीन) कलम ३५ खाली केलेल्या प्रत्येक घोषणेवर किंवा काढलेल्या प्रत्येक आदेशावर ;

(चार) कलम ३८ खाली केलेल्या प्रत्येक घोषणेवर, किंवा काढलेल्या प्रत्येक आदेशावर ;

(पाच) कलम ४१ खाली दिलेल्या प्रत्येक निवाड्यांवर ;

(सहा) कलम ४२ खाली दिलेल्या प्रत्येक निर्णयावर किंवा काढलेल्या प्रत्येक आदेशावर त्या कलमाच्या तरतुदीस अधीन राहून ;

दाखल करण्यात येईल.

(२) न्यायालयाविरुध्दचे अपील हे—

(अ) बृहन्मुंबईत लघुवाद न्यायालय, मुंबई याचा कोणताही आदेश, निर्णय घोषणा किंवा निवाडा याविरुध्द असेल तेव्हा, उक्त न्यायालयाच्या दोन न्यायाधीशाच्या मंडळाकडे दाखल करता येईल. यामंडळात, असा आदेश, निर्णय, घोषणा किंवा निवाडा ज्याचा असेल त्या न्यायाधीशाचा समावेश होणार नाही ;

(ब) इतरत्र, प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ अन्वये स्थापन केलेल्या लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधीशाचा किंवा कोणत्याही दिवाणी न्यायाधीशाच्या न्यायालयाचा कोणताही आदेश, निर्णय, घोषणा किंवा निवाडा याविरुध्द असल तेव्हा जिल्हा न्यायालयाकडे दाखल करता येईल, १८८७ चा ९.

(३) खंड (१) खालील प्रत्येक अपील हे आदेश, निर्णय, घोषणा किंवा यथास्थिती, निवाडा यांच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत करण्यात येईल. परंतु या खंडाद्वारे विहित केलेल्या कालमर्यादेची गणना करताना मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५ आणि १२ यात अंतर्भूत असलेल्या तरतुदी शक्य असेल तेथवर लागू होतील. १९६३ चा ३६.

(४) या प्रकरणाखाली न्यायालयाने दिलेला कोणताही आदेश, घेतलेला निर्णय केलेली घोषणा किंवा दिलेला निवाडा याविरूध्द कोणतेही दुसरे अपील दाखल करता येणार नाही.

१८६९ चा १४. **५०.** जिल्हा न्यायाधीशास, कलम ४९ खाली दाखल केलेले कोणतेही अपील निकालात काढण्यासाठी मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ याच्या कलम २७ अन्वये अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार निहित केलेल्या सहाय्यक न्यायाधीशाकडे किंवा दिवाणी न्यायधीशांकडे पाठवता येईल. अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेल्या सहाय्यक न्यायाधीशाकडे किंवा दिवाणी न्यायाधीशाकडे विवक्षित अपिले निकालात काढण्यासाठी पाठविण्याचा जिल्हा न्यायाधीशांचा अधिकार.

१९५९ चा मुंबई ३६. **५१.** (१) मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या प्रकरणाखालील कार्यवाहीबाबत देय असणारी न्यायालय फी ही पुढील दरानुसार असेल :— न्यायालय फी.

| | |
|---|---|
| (एक) कलम २४, पोट-कलम (१) किंवा कलम २७ खालील अर्जावर किंवा कलम २७, पोट-कलम (४) खालील निवाड्यावर. | रुपया १; |
| (दोन) खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवाड्याव्यतिरिक्तच्या निवाड्यावर. | निवाड्याच्या रकमेच्या प्रत्येक शंभर रुपयांस किंवा त्याच्या भागास रुपया १ प्रमाणे रुपये ५० या कमाल मर्यादेस अधीन राहून ; |
| (तीन) कलम २७, पोट-कलम (३) किंवा (४) खालील न्यायालयाच्या आदेशाविरूध्दच्या किंवा कलम ३१ खाली दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या किंवा काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या विरूध्दच्या अपिलावर. | रुपये २; |
| (चार) खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपिलाव्यतिरिक्तच्या अपिलांवर. | अंतर्भूत रकमेच्या प्रत्येक शंभर रुपयांस किंवा त्याच्या भागास रुपया १ प्रमाणे रुपये ५० या कमाल मर्यादेस अधीन राहून. |

(२) कोणत्याही कायद्यात एतद्विरुध्द काहीही अंतर्भूत असले तरी, या प्रकरणाखालील कार्यवाहीबाबत देय असलेली न्यायालय फी ही, खर्च देण्याबाबत आदेश दिलेल्या पक्षकाराच्या मालमत्तेवरील पहिला भार असेल व ती विहित करण्यात येईल अशा रीतीने वसुलीयोग्य असेल.

१९०८ चा ५. **५२.** या प्रकरणान्वये बजावणे आवश्यक असलेली कोणतीही नोटीस, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने व त्याबाबत नियम करण्यात येतील तेव्हा विहित करण्यात येईल अशा रीतीने बजावण्यात येईल. नोटीस कशा रीतीने बजावण्यात येईल ते.

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतूदी कार्यवाही-बाबत लागू असणे.

**५३.** या प्रकरणात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याशिवाय, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या तरतुदी ह्या प्रकरणाखालील सर्व कार्यवाहयास लागू असतील : १९०८ चा ५.

परंतु, न्यायालयास, योग्य त्या प्रकरणी व त्यास न्याय्य असल्याचे दिसून येईल अशा शर्तीवर कलम २४ किंवा ३५ अन्वये त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत पहिल्या प्रकरणामध्ये कलम २४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेनंतर पक्षकारांची नावे जादा दाखल करण्यात यावयाची किंवा काढून टाकण्यात यावयाची असली तरी, उक्त संहितेच्या पहिल्या अनुसूचीतील आदेश एक मधील नियम १० अन्वये पक्षकारांची नांवे जादा दाखल करण्याच्या किंवा तो काढून टाकण्याच्या आपल्या अधिकारांचा वापर करता येईल.

दिवाणी दावे किंवा कार्यवाही यास रोध.

**५४.** या प्रकरणाअन्वये अन्यथा, तरतूद केली असेल तेवढे खेरीज करून एरव्ही व कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही दिवाणी न्यायालय—

(अ) या प्रकरणाखाली न्यायालयापुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही बाबीच्या बाबतीत ;

(ब) या प्रकरणाखालील न्यायालयाच्या कोणत्याही कार्यपध्दतीची विधिग्राह्यता किंवा न्यायालाचा कोणताही निवाडा, घोषणा, निर्णय किंवा आदेश यांच्या वैधतेच्या बाबतीत ; व

(क) अशा निवाड्यानुसार देय असलेल्या कोणत्याही ऋणाच्या वसुलीच्या बाबतीत ;

कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करून घेणार नाही किंवा त्याबाबत कार्यवाही करणार नाही.

न्यायालयापुढे असणाऱ्या या प्रकरणाखालील कार्यवाहीचा कालावधी वगळणे.

**५५.** न्यायालयाने किंवा अपील न्यायालयाने जिला ऋणको नसल्याचे ठरवले असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून देय असलेल्या कोणत्याही ऋणाच्या बाबतीत, कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करण्यासाठीची किंवा ज्या बाबतीतील अर्ज न्यायालयाने किंवा अपील न्यायालयाने फेटाळला असेल अशा अर्जांच्या संबंधात कालमर्यादा मोजतांना या प्रकरणाखालील अशा ऋणाच्या बाबतीत ज्या कालावधीत न्यायालयापुढे किंवा अपील न्यायालयापुढे कार्यवाही चालविण्यात आली होती तो कालावधी, वगळण्यात येईल.

कर्जाच्या परतफेडीपूर्वी उभे पीक, इत्यादींच्या अन्य संक्रामणास मनाई.

**५६.** (१) या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीत किंवा निवाड्यात जी व्यक्ती पक्षकार आहे किंवा पक्षकार होती व जी कलम ६०, खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या साधनसंस्थेची किंवा कोणत्याही परिसंस्थेची ऋणी आहे अशी कोणतीही व्यक्ती, पिकांसाठी पैसा म्हणून किंवा हंगामी अर्थसहाय्य म्हणून, तिला देण्यात आलेल्या कोणत्याही कर्जासंबंधात अशा कर्जाची पूर्णतः परतफेड होईपर्यंत, संस्थेच्या किंवा यथास्थिति, परिसंस्थेच्या पूर्वपरवानगीशिवाय आपल्या जमिनीवरील उभी पिके किंवा शेतीचे उत्पादन तारणगहाण ठेवणार नाही किंवा त्याची विक्री करणार नाही.

(२) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून, जी व्यक्ती, उभी पिके किंवा शेतीचे उत्पादन तारणगहाण ठेवील किंवा त्याची विक्री करील अशा कोणत्याही व्यक्तीस, अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) कोणतेही फौजदारी न्यायालय ज्या न्यायालयापुढे कार्यवाही चालवण्यात आली होती किंवा ज्या न्यायालयाने निवाडा दिला होता अशा न्यायालयाच्या लेखी तक्रारीवरून असेल त्याखेरीज या कलमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**५७.** (१) राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाखालील नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करता येईल.

(२) या प्रकरणात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता राज्य शासनास, सर्वसाधारणतः या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, या प्रकरणाशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(३) या प्रकरणाखाली केलेले सर्व नियम पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(४) या प्रकरणाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे हे संमत होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राहयतेस बाध येणार नाही.

**५८.** कलम ६० च्या तरतुदीस बाध न आणता, या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे,— आणखी सूट.

(अ) राज्याच्या मालकीच्या किंवा राज्याकडून नियंत्रित करण्यात येणाऱ्या (कंपनीसह) इतर कोणत्याही महामंडळाला ;

१९६१ चा महा. २४. (ब) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केली असल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्थेला ;

ऋणकोकडून येणे असलेल्या कोणत्याही ऋणांवर व दायित्वांवर परिणाम होणार नाही.

**५९.** कोणत्याही व्यक्तीच्या ऋणांसंबंधात, महाराष्ट्र (विदर्भ प्रदेश) ऋणको शेतकरी सहाय्य अधिनियम, १९६९, हैदराबाद ऋणको शेतकरी सहाय्य अधिनियम, १९५६ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली ऋणांचे समायोजन करण्यात आले असेल किंवा ती कमी करण्यात आली असतील त्याबाबतीत, अशा व्यक्तीला या प्रकरणाखाली त्या ऋणांसंबंधात कोणतेही आणखी समायोजन करून मिळण्याचा किंवा ती कमी करून मिळण्याचा हक्क असणार नाही.] इतर कोणत्याही कायद्याखाली समायोजित केलेल्या ऋणांचे या प्रकरणाखाली आणखी समायोजन न करणे.

१९६९ चा महा. २२. १९५६ चा हैदराबाद १६.

## प्रकरण सहा

# सूट आणि निरसन

[1][६०]. कलम १९ च्या तरतुदीस बाध न आणता कोणत्याही ऋणकोचे किंवा लहान शेतकऱ्याचे सूट पुढील बाबीपैकी कोणत्याही बाबीखाली येणारे ऋण आणि इतर दायित्वे यांवर या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही :—

(अ) कोणत्याही शासनाला देय असलेली ऋणे,

---

[1] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १२ अन्वये कलमे २२ आणि २३ यांना अनुक्रमे कलम ६० आणि ६१ हे फेरक्रमांक देण्यात आले.

(ब) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला देय असलेली ऋणे, यात कर, उपकर किंवा फी म्हणून देय असलेल्या रकमेचा समावेश होतो ;

(क) पुढील संस्थांना देय असलेली ऋणे—

(एक) (अ) बँकिंग विनिमय अधिनियम, १९४९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली बँकिंग कंपनी, १९४९ चा १०.

(ब) स्टेट बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९५५ अन्वये प्रस्थापित केलेली स्टेट बँक ऑफ इंडिया ; १९५५ चा २३.

(क) स्टेट बँक ऑफ इंडिया (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली दुय्यम बँक ; १९५९ चा ३८.

(ड) बँकिंग कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम १९७०, अन्वये प्रस्थापित केलेली तत्सम नवीन बँक ; १९७० चा ५.

(ई) कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ अधिनियम, १९६३ अन्वये प्रस्थापित केलेले कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ ; आणि १९६३ चा १०.

(दोन) राज्य शासन, **शासकिय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशी इतर कोणतीही बँकिंग, वित्तीय किंवा कोणतीही परिसंस्था ;

(ड) जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाची कोणतीही रक्कम ;

(ई) ऋणकोला, त्याच्या मालकाने, उत्सव, वैद्यकीय उपचार यांसाठी किंवा शैक्षणिक, विवाह विषयक किंवा अंत्यसंस्कारविषयक खर्च यांसारख्या विशिष्ट प्रयोजनासाठी कर्जापोटी दिलेली कोणतीही आगाऊ रक्कम ;

(फ) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० खाली नोंदविण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेला देय असलेली कोणतीही रक्कम ; १९५० चा मुंबई २९.

(ग) सावकारीशी संबंधित नसलेली संविदा किंवा देवघेवीचे व्यवहार यातून उद्भवणारी कोणतीही हक्क मागणी.

सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ति.

[1]**[६१].** (१) महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अध्यादेश, १९७५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश ७.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरीही, अशा रीतीने निरसित केलेल्या अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा काढलेला कोणताही आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असेल त्याखेरीज, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीद्वारे करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई किंवा केलेली नियुक्ती किंवा काढलेला आदेश किंवा यथास्थिति अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

[1] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १२ अन्वये कलमे २२ आणि २३ यांना अनुक्रमे कलमे ६० आणि ६१ हे फेरक्रमांक देण्यात आले.

शा. मु. औ.-(एच) २७१-६०५०-११-२००६.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद